नागपूर मुख्य कार्यालय
कॉटन मार्केट, नागपूर -४४००१८

संपर्क
संपादकीय : ९९२२९७००२३
वितरण : ८८८८६४७७५३
जाहिरात : ७४४७७३५८५१ /९३२६९०६०६२
नागपूर कार्यालय संपर्क : ७४४७७३५८५१

नागपुर, अकोला, अमरावती, खामगांव, यवतमाळ, वर्धा, गडचिरोली, वाशीम, भंडारा, गोंदिया, मुंबई, पालघर (ठाणे), नाशिक आणि चंद्रपूर महासागर

# महासागर

Epaper: www.epaper.dainikmahasagar.in nagpurpost@gmail.com / mahasagarngp@gmail.com




सुखकर्ता दुखहर्ता... लाडक्या बाप्पाचे आज आगमन! गणेश चतुर्थी निमित्त सर्व भाविक भक्तांना महासागरतर्फे हार्दिक शुभेच्छा


* वर्ष १६ * अंक १११ * * गडचिरोली * बुधवार, दिनांक २७ ऑगस्ट २०२५ ८ पाने ● किमत रू. २/-+ वितरण खर्च रू. १ = एकुण ३ रू.) * विशेष ऑफर : महासागर + नागपूर पोस्ट = ४ रु. फक्त


अग्राग्रलेख

## खरीखरी..

## विघ्न हरा हो बाप्पा !

आज आपले महादैवत महा आराध्य श्रीगणेशाच्या आगमनाचा पहिला दिवस आहे. गणेश ही देवता प्राचीन काळापासून पूजनीय आहे. गणेशाच्या नावाने कितीतरी आख्याने आहेत कथा सुद्धा आहेत. महाराष्ट्र तर गणेश पूजक असा प्रदेश आहे. त्यातल्या त्यात आपल्या कोकणात आणि मुंबईत गणरायाचा दिमाख आणि रुबाब काही औरच असतो. १४ विद्या आणि ६४ कलांच्या या देवतेची पूजा संपूर्णपणे मनोभावे करणारे महाराष्ट्र हे एकमेव राज्य आहे. बाळ गंगाधर म्हणजेच लोकमान्य टिळक यांनी देशात जनजागृतीसाठी शिवजन्मोत्सव आणि गणेश पूजन स्वातंत्र्यपूर्व काळात चालू केले होते. त्या काळाच्या आणि नंतरच्या अनेक वर्षांपर्यंत गणेश चतुर्थी ते अनंत चतुर्दशी या दहा तिथीमध्ये गणेशोत्सवाच्या काळात सर्वच गणेश भक्तांना बौद्धिक मेजवानी मिळत होती. गेल्या काही वर्षात मेजवानी तर सुरू आहे पण बुद्धीदाता गणेशाच्या बुद्धीचा प्रकाश भक्तांच्या डोक्यावरून जातोय की काय असे दिसून येत आहे. आपल्या देशातील राजेशाही तर कधीच लुप्त झालेली आहे. मुंबईत आता लालबागचा राजा, फोर्टचा राजा, अंधेरीचा राजा, गणेश गल्लीचा राजा असे प्रत्येक उपनगरातील वेगवेगळे राजे आजपासून विराजमान होतील. त्यामुळे मुंबईमध्ये अनेक राजे आहेत, फक्त राजगाद्या गेल्या आहेत तरी आपल्या या देवाची गादी कायम आहे. या गणेश भक्तीचा महाराष्ट्राला स्वाभिमान वाटणे साहजिकच आहे कारण या भक्तीसाठी आपण करोडो रुपये खर्च करतो. हे दहा दिवस अत्यंत मोठ्या इव्हेंटचे असतात. प्रसिद्ध राजांच्या दर्शनासाठी कितीतरी तास उभे राहण्याचा पराक्रम अनेक भक्तांनी केलेला आपण बघतो. सामान्य जनांच्या देवभक्तीचे हे उत्तम उदाहरण आहे. तरीही इतक्या भक्तीभाव संपन्न महाराष्ट्रावर दिवसेंदिवस संकटे का येत आहेत? हा प्रश्न आमच्या मनात वारंवार येतो कारण कधी मुसळधार पाऊस घडतो, कधी अपघातात अनेक माणसे मरतात, कधी दंगे धोपे होतात, कधी भरलेल्या शेतात शेतक?यांच्या स्वप्नावर पाणी फिरवणारी आपत्ती येते तर कोकणात जाणा?या गणेश भक्तांसाठी खड्ड्यांची शर्यत उभी राहते. यासह अनेक नको ते प्रकारही होत असतात. नोंद घेण्याची गोष्ट म्हणजे या गणेशोत्सवाच्या काळात तर ध्वनी प्रदूषणाचा इतका काही विस्फोट होतो की त्यामुळे संपूर्ण धरती हादरून जाते. पण, हा पण जाणून घ्यावा... अशा या महामंगल सोहळ्यात जी धार्मिकता दिसली पाहिजे, जे मांगल्ये दिसले पाहिजे, जे पावित्र्य दिसले पाहिजे जी शांततापूर्ण श्रद्धा आणि साधना दिसली पाहिजे. ते कुठेतरी हरवल्याचे दिसत आहे आणि ते का दिसत आहे हे आम्हालाही कळत नाही. कदाचित हा आमच्या बुद्धीचा आवाका एवढा नसण्याचा हा परिणाम असावा. तेव्हा आता आपल्या सर्वांच्या लाडक्या आराध्य दैवताला गणेशाला करबद्ध प्रार्थना आहे की, बाप्पा मोरया या तुम्ही इथे या. महाराष्ट्र आणि देशातील सर्व संकटांचे निवारण करा हीच आमची तुमच्या चरणी नम्र विनंती आहे. गणपती बाप्पा आम्ही तुमच्यासमोर बालके आहोत. महाराष्ट्र आणि आपल्या भारत देशावर जितकी विघ्ने आहेत त्यांना बाजूला सारा, त्यांना हरा आणि खऱ्या अर्थाने लोकांचे राजे म्हणजेच गणराया व्हा. हा संपूर्ण महाराष्ट्र बरा करा. तुमच्या चरणी साष्टांग दंडवतासह आम्ही सादर आहोत. म्हणा,
गणपती बाप्पा मोरया!


nagpurpost@gmail.com
Mob. No. 9922970023


## वैष्णोदेवी येथील अर्धकुमारीमध्ये भूस्खलन

# ५ जणांचा मृत्यू, १४ जखमी

■ **वृत्तसंस्था, जम्मू, दि. २६ :**
वैष्णोदेवी यात्रा मार्गावर अर्धकुमारीजवळ भूस्खलन झाले. पीटीआय वृत्तसंस्थेच्या वृत्तानुसार, या अपघातात ५ जणांचा मृत्यू झाला आहे आणि १४ जण जखमी झाले आहेत. जखमींना कटरा येथील आरोग्य केंद्रात नेण्यात आले आहे. अपघातानंतर वैष्णोदेवी यात्रा पुढे ढकलण्यात आली आहे.



दुसरीकडे, जम्मूमधील तावी नदीवरील पुलाजवळ रस्ता खचला. या अपघातात अनेक वाहने कोसळली. पोलिस बचावकायासाठी पोहोचले आहेत. नुकसानीची अद्याप कोणतीही माहिती नाही. मंगळवारी जम्मू-काश्मीरमधील डोडा जिल्ह्यात ढगफुटीमुळे अनेक ठिकाणी अचानक पूर आला. त्यात १० ते १५ घरे वाहून गेली. गेल्या २४ तासांत डोडामध्ये ४ जणांचा मृत्यू झाला आहे. तथापि, हे मृत्यू कोणत्या भागात झाले याची माहिती समोर आलेली नाही.

जम्मू-काश्मीरमध्ये सलग तीन दिवसांपासून मुसळधार पाऊस पडत आहे. दोन दिवसांपासून शाळा बंद आहेत. जम्मू-श्रीनगर आणि बटोटे-किश्तवाडसह अनेक रस्ते आणि अनेक राष्ट्रीय महामार्ग बंद आहेत. अनेक ठिकाणी नेटवर्क नसल्याने लोक इंटरनेट आणि कॉलिंग सेवा वापरू शकत नाहीत.

त्याच वेळी, हिमाचल प्रदेशातील कुल्लू आणि मनाली येथे २० हून अधिक घरे, दुकाने आणि रेस्टॉरंट्स बियास नदी आणि पर्वतीय प्रवाहात बुडाले आहेत.

## लंडनमध्ये साकारणार 'महाराष्ट्र भवन'

■ **महासागर प्रतिनिधी**
**मुंबई, दि. २६ :**

### शासनाकडून ५ कोटींचा निधी

लंडनमधील मराठी लोकांना आता स्वतःचे सांस्कृतिक केंद्र मिळणार आहे. महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र मंडळ, लंडन या संस्थेला 'चर्च ऑफ इंग्लंड'ची एक जुनी इमारत खरेदी करण्यासाठी आणि तिथे 'महाराष्ट्र भवन' उभारण्यासाठी ५ कोटी रुपयांचा निधी मंजूर केला आहे. याबाबतची माहिती उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी दिली.

महाराष्ट्र मंडळ लंडन



या निर्णयामुळे अनेक वर्षांपासून लंडनमध्ये स्वतःचे सांस्कृतिक केंद्र असावे, अशी मराठी लोकांची मागणी आता पूर्ण होणार आहे. या मदतीबद्दल महाराष्ट्र मंडळाने शासनाचे आभार मानले आहेत.

लंडनमधील मराठीजनांना आपल्या हक्काचे आणि स्वतःच्या मालकीचे सांस्कृतिक भवन मिळावे, या अनेक वर्षांच्या मागणीला आता मूर्त स्वरूप मिळणार आहे. महाराष्ट्र मंडळ, लंडन या संस्थेला लंडनमधील ह्यचर्च ऑफ इंग्लंडह्यी इमारत खरेदी करुन तिथे महाराष्ट्र भवन उभारण्यासाठी ५ कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे.

महाराष्ट्र मंडळ, लंडन ही परदेशातील सर्वात जुनी मराठी संस्था मानली जाते. १९३२ साली महात्मा गांधींचे सचिव डॉ. एन. सी. केळकर यांनी तिची स्थापना केली. स्थापनेपासूनच मराठी बांधवांना सामाजिक आणि सांस्कृतिक धाग्यांनी एकत्र आणण्याचे कार्य हे मंडळ करत आहे. गेली ९३ वर्षे ते विविध सण-उत्सव, सांस्कृतिक कार्यक्रम आणि सामाजिक उपक्रमांद्वारे मराठी अस्मिता जपण्यात अग्रेसर राहिले आहे.

## आजपासून ट्रम्पचा ५०% टॅरिफ

■ **वृत्तसंस्था, नवी दिल्ली, दि. २६ :**
अमेरिकन सरकारने भारतातून आयात होणाऱ्या वस्तूंवर अतिरिक्त २५% कर लादण्याची अधिकृत अधिसूचना जारी केली आहे. दंड म्हणून लावण्यात आलेला हा कर भारतीय वेळेनुसार २७ ऑगस्ट रोजी सकाळी ९:३१ वाजल्यापासून लागू होईल.



रशियाकडून तेल खरेदी केल्याबद्दल दंड म्हणून राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी ६ ऑगस्ट रोजी हा कर जाहीर केला. यापूर्वी व्यापार तूट लक्षात घेऊन ७ ऑगस्टपासून भारतावर २५% कर लादण्यात आला होता. याचा अर्थ असा की भारतीय वस्तूंवरील एकूण कर आता ५०% पर्यंत असेल.

त्यात म्हटले आहे की, 'या दस्तऐवजाच्या यादीत नमूद केलेले शुल्क भारतातून येणाऱ्या वस्तूंवर लागू होईल. या वस्तू वापरासाठी अमेरिकेत आणल्या जातील किंवा गोदामातून बाहेर काढल्या जातील.

## मराठा आरक्षणाच्या वादात शिंदे गटाची सावध भूमिका

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. २६ :**
मराठा आरक्षणाचा मुद्दा पुन्हा तापला असून, मनोज जरांगे २९ ऑगस्टपासून मुंबईतील आझाद मैदानावर आमरण उपोषणाला बसणार आहेत. हायकोर्टाने त्यांना मुंबई येण्यापासून मनाई केली असली, तरी ते आपल्या आंदोलनावर ठाम आहेत.

या सर्व पार्श्वभूमीवर शिंदे गटाने मात्र सावध भूमिका घेत मौन बाळगल्याचे दिसून येत आहे. त्यातच मनोज जरांगे यांच्या आंदोलनाबद्दल माध्यमांसमोर कोणतेही विधान न करू नका, अशी सक्त ताकीद उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आपल्या मंत्र्यांना दिल्याची माहिती समोर येत आहे.

मनोज जरांगे यांनी मराठा आरक्षणासाठी मुंबईत मोर्चा काढण्याची घोषणा केली असून, त्यांचा रोख मुख्यत्वे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यावर आहे.



शिवसेनेच्या मंत्र्यांना शिंदेंच्या सूचना

**गुप्त बैठकीत काय?**

जरांगे सातत्याने फडणवीसांवर टीका करत असताना, एकनाथ शिंदे मात्र मौन राखताना दिसत आहेत. मंत्रिमंडळ बैठकीनंतर शिवसेनेच्या मंत्र्यांच्या घेतलेल्या गुप्त बैठकीत त्यांनी आपल्या मंत्र्यांनाही माध्यमांसमोर प्रतिक्रिया देऊ नका, अशा सूचना दिल्या आहेत. यासोबतच बोलताना महायुती बाबत समन्वय साधून बोलणे अपेक्षित आहे, अशी चर्चा झाल्याचे समजते. णेशोत्सव काळामध्ये जास्तीत जास्त लोकांपर्यंत पोहोचा, गाव तिथे शाखा, घर तिथे शिवसैनिक यानुसार पक्षवाढीसाठी प्रयत्न करा, असे निर्देश एकनाथ शिंदेंनी त्यांच्या मंत्र्यांना दिलेत.

## जरांगेच्या आंदोलनाला हायकोर्टाची मनाई

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. २६ :**
मनोज जरांगे पाटील यांच्या मुंबईतील आंदोलनाला मुंबई उच्च न्यायालयाने परवानगी नाकारली आहे. मुंबईच्या बाहेर आंदोलन करण्यास परवानगी दिली आहे. यावर न्यायदेवता आम्हाला न्याय देईल, अशी प्रतिक्रिया मनोज जरांगे यांनी दिली आहे.

लोकशाहीच्या मार्गाने आंदोलन करण्याचा आमचा हक्क आहे, हे लोकशाहीच्या विरोधात होत असल्याचे मनोज जरांगे यांनी म्हटले आहे.





**श्री गजानन महाराज संस्थान, शेगांव जि. बुलढाणा**

**(पब्लिक ट्रस्ट रजि. नं. ए-२५० बुल.)**

**श्रींचा ११५ वा पुण्यतिथी उत्सव**

दरवर्षी प्रमाणे यावर्षी श्रींचा ११५ वा पुण्यतिथी उत्सव दि.२४/०८/२०२५ ते २८/०८/२०२५ पावेतो परंपरेनुसार कार्यक्रम होऊन संपन्न होईल. आपण सर्वांनी उत्सवात सर्वतोपरी सहभागी व्हावे, ही विनंती.

श्री मंदिर परिसरात भाविकांची प्रचंड गर्दी होईल हे लक्षात घेता व काही अप्रिय घटना घडू नये याची दक्षता म्हणून वन-वे (एकेरी मार्ग) करण्यात आला आहे. त्यात श्रींची समाधि दर्शन व्यवस्था, श्रीमुख दर्शन व्यवस्था, श्री महाप्रसाद, श्री पारायण कक्ष मंडप इत्यादी व्यवस्था केलेली आहे.

श्री संस्थानच्या शेगांव व शाखांसह भक्तनिवासातील खोल्या अगोदरच ऑनलाईन बुकींग करण्याची कोणतीही पध्दती प्रचलित /अस्तित्वात नाही.

अनधिकृत वेबसाईटचे माध्यमातून भक्तनिवासातील खोल्या ऑनलाईन बुकींग करण्याचे नांवाखाली भक्तांची फसवणूक होण्याचे प्रकार समोर येत आहेत. कृपया भक्तांनी याची नोंद घेऊन सावधगिरी बाळगावी, ही विनंती.

व्यवस्थापकीय विश्वस्त

## शिंदे समितीला ६ महिन्यांची मुदतवाढ

### राधाकृष्ण विखे पाटलांची माहिती



**मुंबई :** मराठा आरक्षण नेते मनोज जरांगे पाटील यांच्या मुंबईतील आंदोलनाला मुंबई उच्च न्यायालयाने परवानगी नाकारली आहे. त्यानंतर देखील जरांगे पाटील आंदोलनावर ठाम असल्याचे त्यांनी म्हटले आहे. तसेच त्यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यावर आरोप करताना म्हटले की हे फडणवीसांचे षड्यंत्र असून मी ते उधळून लावणार असल्याचा इशारा दिला आहे. न्यायालयाने दिलेल्या निर्णयावर मराठा आरक्षण उपसमितीचे अध्यक्ष राधाकृष्ण विखे पाटील यांनी प्रतिक्रिया दिली आहे. माध्यमांशी बोलताना राधाकृष्ण विखे पाटील म्हणाले, सरकारकडून शिंदे समितीला आणखी 6 महिन्यांची मुदत देण्यात आली आहे. तसेच जरांगे यांनी केलेल्या सगेसोयऱ्यांच्या मागणीवर आम्ही आज चर्चा केली आहे. सर्वांची भूमिका सकारात्मक आहे. मुख्यमंत्री यांनी देखील यापूर्वी विशेष पुढाकार घेऊन मराठा समाजाला 16 टक्के आरक्षण दिले होते. महाविकास आघाडीच्या काळात हे आरक्षण गेले. आता पुन्हा एकदा महायुती आल्यावर 10 टक्के आरक्षण देण्याचा निर्णय घेतला होता. आता कायदेशीर प्रक्रिया जी करायची आहे ती आम्ही करत आहोत.

### नांदेड- मुंबई वंदे भारत एक्सप्रेसने उघडले मराठवाड्याच्या समृद्धीचे द्वार : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

# नांदेड - मुंबई वंदे भारत एक्सप्रेसचा मुख्यमंत्र्यांच्या हस्ते शुभारंभ

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. २६ :**

मराठवाड्याच्या विकासासाठी शासन दळणवळण सुविधांवर भर देत आहे. 'वंदे भारत एक्सप्रेस' मुळे नांदेड शहर मुंबईच्या अधिक जवळ आले आहे. यामुळे निश्चितच मराठवाड्याच्या समृद्धीचे द्वार उघडले आहे, असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला.

नांदेड - मुंबई वंदे भारत एक्सप्रेसचा नांदेड रेल्वे स्थानकावरून शुभारंभ करण्यात आला. या रेल्वे गाडीचा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मंत्रालयातून ऑनलाइन पद्धतीने हिरवा झेंडा दाखवून शुभारंभ केला. मंत्रालयात आयोजित कार्यक्रमाला सार्वजनिक आरोग्य राज्यमंत्री मेघना




बोर्डीकर साकोरे, मध्य रेल्वेचे महाव्यवस्थापक धर्मवीर मीना, प्रधान मुख्य परिचालन अधिकारी श्याम सुंदर गुप्ता, मुख्य प्रशासकीय अधिकारी (बांधकाम) अवनीश कुमार पांडे, विभागीय प्रबंधक हिरेश मीना आदी उपस्थित होते.

मुख्यमंत्री म्हणाले, प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वात भारतीय रेल्वे कात टाकत आहे. प्रगत देशांसारखी आरामदायी सुविधा असलेली भारतात निर्मित वंदे भारत रेल्वे ही त्याचेच प्रतीक आहे. मुंबई ते नांदेड हे ६१० किलोमीटरचे अंतर ९ ते ९.३० तासात पूर्ण होणार आहे.

पूर्वी जालनापर्यंत धावणारी वंदे भारत आता हुजूर साहिब नांदेड पर्यंत जात आहे. या रेल्वे गाडीची क्षमता ५०० वरून १४४० पर्यंत वाढवण्यात आली आहे. तसेच गाडीचे डब्बे ८ वरून २० पर्यंत वाढवण्यात आले आहे.

नांदेड हे शिख धर्मियांचे महत्त्वाचे श्रद्धास्थान आहे. त्यामुळे येथे येणाऱ्या भाविकांना, प्रवाशांना वेगवान व आरामदायी प्रवासाची अनुभूती ' वंदे भारत' एक्सप्रेसच्या माध्यमातून होणार आहे. वंदे भारत एक्सप्रेस च्या सुखकर, सुरक्षित आणि आरामदायी प्रवासासाठी मराठवाड्यातील जनतेचे अभिनंदनही मुख्यमंत्री फडणवीस यांनी यावेळी केले.

नांदेड येथे आयोजित कार्यक्रमप्रसंगी खासदार अशोक चव्हाण, खासदार डॉ. अजित गोपछडे, आमदार विक्रम काळे, जिल्हाधिकारी राहुल कर्डीले, नांदेड परिक्षेत्राचे पोलिस उपमहनिरीक्षक शहाजी उमाप, पोलिस अधीक्षक अबिनाश कुमार, डीएमआर प्रदीप कांबळे आदी उपस्थित होते.

## कृत्रिम फुलांमुळे शेतकरी संकटात

**मुंबई :** राज्यात ऊद्यापासून गणेशोत्सवाला सुरवात होत आहे. घरगुती आणि सार्वजनिक गणेशोत्सव मंडळासाठी आरास व मखर तयार करण्याकरीता मोठ्या प्रमाणावर फुलांचा वापर केला जातो. मात्र, शेतकऱ्यांनी शेतात पिकविल्या नैसर्गिक फुलांऐवजी चीन मधून आयात केलेल्या प्लास्टिक अथवा सिंथेटिक पदार्थांपासून बनवलेली कृत्रिम फुले मोठ्या प्रमाणावर वापरली जात आहेत. हा वापर शेतकऱ्यांच्या आर्थिक ऊत्पन्नावर विपरीत परिणाम करणारा तर आहेच, परन्तु पर्यावरणालाही हानीकारक आहे. या पार्श्वभूमीवर कृषी मंत्री दत्तात्रय भरणे यांच्या पुढाकाराने पर्यावरण, पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय विकास मंत्री पंकजा मुंडेंना यासंदर्भात पत्र देत कृत्रिम फुलांच्या वापरामुळे शेतकऱ्यांवर ओढवलेल्या आर्थिक संकटातून शेतकऱ्यांची सुटका करण्यासाठी, शेतकरी हितास्तव पर्यावरण विभागामार्फत आवश्यक कायदेशीर उपाययोजना करत कृत्रिम फुलांच्या वापरावर बंदी घालण्याची मागणी करण्यात आली आहे. कृत्रिम फुलांच्या वापरामुळे फुल शेती धोक्यात येऊन शेतकरी आर्थिक संकटात सापडलेला आहे तसेच हरीतगृहे नष्ट होऊन शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणात आर्थिक नुकसान होऊ लागले आहे. आजच्या काळात विविध धार्मिक, सामाजिक आणि सांस्कृतिक कार्यक्रमांमध्ये कृत्रिम (प्लास्टिक-सिंथेटिक) फुलांचा वापर मोठ्या प्रमाणावर होत आहे. हे फुले दिसायला आकर्षक असली, तरी त्यांचा पर्यावरणावर आणि स्थानिक अर्थव्यवस्थेवर मोठा परिणाम होत आहे. त्यामुळे याचं गांभीर्य लक्षात घेता शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी कृषी मंत्री दत्तात्रय भरणे यांनी पुढाकार घेत पंकजा मुंडेंना पत्र लिहित कृत्रिम फुलांच्या विक्रीवर बंदी घालण्याची मागणी केली.

## अंबरनाथ तालुक्यातील जमीन वादावर महसूलमंत्र्यांकडून तोडगा

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. २६ :**



ठाणे जिल्ह्यातील अंबरनाथ तालुक्यातील करवले येथील आवश्यक शासकीय जमीन महानगरपालिकेस भराव भूमी प्रकल्पासाठी दिली जाईल, मात्र गावाच्या विकासासाठी, पुनर्वसनासाठी आणि सोयी सुविधांसाठी जागा शिल्लक राहील, अशा प्रकारे नियोजन करण्यात यावे. यासाठी ग्रामपंचायत आणि महानगरपालिकेने एकत्रित प्रस्ताव सादर करण्याचे निर्देश महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी सोमवारी येथे दिले.

करवले येथील शासकीय जमीन भराव भूमी प्रकल्पावरून सुरू असलेल्या वादावर तोडगा काढण्यासाठी बावनकुळे यांच्या दालनात एक बैठक आयोजित करण्यात आली होती. या बैठकीत आमदार सुलभा गायकवाड यांच्यासह स्थानिक प्रतिनिधी आणि प्रशासकीय अधिकारी उपस्थित होते.

गावाजवळ असलेली ५२ एकर शासकीय जमीन २०१८ पासून ताब्यात असूनही तिचा योग्य वापर झालेला नाही, याबद्दल ग्रामस्थांनी नाराजी व्यक्त केली. स्थानिक रहिवाशांनी प्रकल्पासाठी २० एकर जागा वगळण्याची मागणी केली आहे. त्यामुळे लग्न समारंभासाठी हॉल, मुलांसाठी क्रीडांगण आणि इतर सार्वजनिक सुविधांसाठी ती वापरता येईल, अशी भूमिका ग्रामस्थांनी मांडली. प्रस्तावित ५ हेक्टर जागेत शाळा, मैदान आणि इतर सोयी-सुविधांचा समावेश केला जाईल, असे प्रशासनाकडून सांगण्यात आले. ठाणे जिल्हाधिकाऱ्यांनी ५.५ हेक्टर पर्यायी जागा देण्याचा विचार सुरू असल्याचे स्पष्ट केले. आदिवासी वाड्यातील घरांच्या पुनर्वसनाचा मुद्दाही उपस्थित करण्यात आला. ग्रामस्थांनी २०११ पूर्वीचीं १०० घरे नियमित करून त्याजागी घरे बांधून देण्याची मागणी केली. याकरिता ग्रामपंचायतीकडून १०० लोकांची सुधारित यादी तयार करून देण्याचा प्रस्ताव देण्यात आला.

मनमाड-इंदूर रेल्वे मागार्साठी होणाऱ्या भूसंपादन प्रक्रियेत शेतकऱ्यांवर कोणताही अन्याय होणार नाही, असे नमूद करुन एक विशेष समिती स्थापन करुन पुनःसर्वेक्षण करण्यात यावे आणि शेतकऱ्यांना त्यांच्या जमिनीला योग्य आणि वाढीव मोबदला मिळावा, असे निर्देश बावनकुळे यांनी सोमवारी येथे दिले. बैठकीला पणन आणि राजशिष्टाचारमंत्री जयकुमार रावल, धुळे जिल्हाधिकारी, आणि भूसंपादन अधिकारी (दूरदृश्य प्रणालीद्वारे) उपस्थित होते. यावेळी बाधित शेतकऱ्यांनी आपल्या मागण्यांचे निवेदन सादर केले. भूसंपादनासाठी त्यांना योग्य मोबदला मिळत नाही, यासहअनेक मुद्दे उपस्थित केले. प्रति चौरस मीटर दराने मोबदला, महापालिका हद्दीतील जमिनींना वाढीव दर, पिकांचे आणि विहिरींचे योग्य मूल्यांकन, तसेच रेल्वे मागार्मुळे शेतांचे झालेले तुकडे आणि पुराच्या पाण्याचा धोका आदी मुद्दे त्यांनी उपस्थित केले. जिल्हाधिकाऱ्यांनी स्वतः बाधित शेतकऱ्यांबरोबर बैठक घेऊन त्यांच्या समस्या सोडविण्यासाठी प्रयत्न करावेत, अशा सूचना बावनकुळे यांनी दिल्या.

## सार्वजनिक मंडळांना ७ दिवस ध्वनिक्षेपक वापरण्याची मुभा

■ **महासागर प्रतिनिधी, पुणे, दि. २६ :**

राज्यशासनाने गणेश उत्सव हा राज्य महोत्सव म्हणून साजरा करण्याचे घोषित केले आहे. या पार्श्वभूमीवर जिल्ह्यात सार्वजनिक गणेश मंडळाला ध्वनी प्रदुषण संबंधी नियमांचे पालन करुन गणेशोत्सवादरम्यान ७ दिवस सकाळी ६ वाजल्यापासून ते रात्री १२ वाजेपर्यंत ध्वनिक्षेपक व ध्वनिवर्धकाचा वापर करण्यास परवानगी देण्याबाबतचा आदेश जिल्हाधिकारी जितेंद्र डूडी यांनी निर्गमित केला आहे. ध्वनिक्षेपक व ध्वनिवर्धक वापराच्या निर्बंधास सूट दिल्याबाबत यापूर्वीच्या ३१ जानेवारी २०२५ रोजीच्या आदेशात बदल करून हे सुधारित आदेश जारी करण्यात आले आहेत. यानुसार गणेशोत्सवासाठी शनिवार ३० ऑगस्ट, रविवार ३१ ऑगस्ट, सोमवार १ सप्टेंबर, मंगळवार २ सप्टेंबर, बुधवार ३ सप्टेंबर, गुरुवार ४ सप्टेंबर, शनिवार ६ सप्टेंबर या एकूण ७ दिवसांच्या कालावधीत सदर निबंधांना सूट देण्यात आली आहे. याशिवाय नवरात्री उत्सवासाठी बुधवार १ ऑक्टोबर व गुरुवार २ ऑक्टोबर, ख्रिसमससाठी गुरुवार २५ डिसेंबर आणि वर्षाअखेरसाठी बुधवार ३१ डिसेंबर रोजीही या निबंधांना सूट देण्यात आली आहे. तसेच महत्त्वाच्या कार्यक्रमासाठी आवश्यकतेनुसार परवानगी देण्याच्या अनुषंगाने एक दिवस राखीव ठेवण्यात आला आहे. ध्वनी प्रदुषण नियम २००० मधील नियम ३ व ४ व ध्वनी प्रदुषण सुधारित नियम २०१७ च्या नियम ५ उपनियम (३) चे पालन करण्यात यावे, झोनिंग प्रमाणे ठरलेल्या मर्यादेपेक्षा जास्त आवाज ठेवू नये. ही सूट शांतता क्षेत्रात लागू नसेल असेही आदेशात नमूद करण्यात आले आहे.

## नवी मुंबई-उरणमधील भूखंड घोटाळ्यावरून रोहित पवार आक्रमक



**मुंबई :** मंत्री संजय शिरसाट यांनी राजीनामा द्यावा अशी मागणी आम्ही केली आहे. आता 150 एकर मधील 12 टक्केचा विषय आहे. आता आमच्याकडे 300 एकरची फाईल मिळाली आहे. यात आता आम्ही लक्ष घालणार आहोत. जो पर्यंत भूमिपुत्रांना न्याय मिळत नाही. ज्या व्यक्तीने हा भ्रष्टाचार केला आहे, त्याला शिक्षा होत नाही तो पर्यंत आम्ही शांत बसणार नाही.राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे आमदार रोहित पवार यांनी बिवलकर यांना दिलेल्या भूखंडाची पाहणी केली आहे. यानंतर माध्यमांशी संवाद साधत असताना त्यांनी असे म्हटले आहे. रोहित पवार म्हणाले की, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व्यक्ती म्हणून सोडा त्यांचे पद महत्त्वाचे आहे. ते अभ्यासू नेते असून वकील आहेत. त्यांनी आम्हाला सांगितले की पुरावे द्या.

## राज्यातील तीन शिक्षक राष्ट्रीय पुरस्काराचे मानकरी

■ **महासागर प्रतिनिधी, पुणे, दि. २६ :**

राज्यातील तीन शिक्षकांना केंद्रीय शिक्षण मंत्रालयातर्फे दिला जाणारा राष्ट्रीय शिक्षक पुरस्कार जाहीर झाला आहे. येत्या ५ सप्टेंबर रोजी, शिक्षकदिनी दिल्लीमध्ये पुरस्कार प्रदान कार्यक्रम होणार आहे.

राष्ट्रीय शिक्षक पुरस्कारप्राप्त शिक्षकांची यादी केंद्रीय शिक्षण मंत्रालयाने प्रसिद्ध केली. त्यानुसार, देशभरातील ४५ शिक्षकांना पुरस्काराने गौरवण्यात येणार आहे. त्यात राज्यातील तीन शिक्षकांचा समावेश आहे. मुंबईतील अॅटोमिक एनर्जी सेंट्रल स्कूलमधील सोनिया कपूर, नांदेड जिल्ह्यातील अधार्पूर येथील जिल्हा परिषद हायस्कूलमधील डॉ. शेख मोहम्मद वकीउद्दीन शेख हमीदुद्दीन, लातूर येथील दयानंद कला महाविद्यालयातील डॉ. संदीपान जगदाळे यांना राष्ट्रीय पुरस्कार मिळाला आहे.

गेली २३ वर्षे अकरावी-बारावीला संगीत विषयाचे अध्यापन करत आहे. राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय कार्यक्रमांमध्ये विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. विद्यार्थ्यांच्या कलेला प्रोत्साहन दिल्याने २७ विद्यार्थी कलेच्या क्षेत्रात करिअर करत आहेत. आता राष्ट्रीय शिक्षण धोरणानुसार तयार केल्या जात असलेल्या नव्या अभ्यासक्रम निर्मितीमध्येही योगदान दिले आहे. तिसरी ते आठवीच्या विद्यार्थ्यांना संगीत, नृत्य, दृश्यकला, नाटक शिकवले जाणार आहे. गेल्या काही वर्षांत स्पर्धा परीक्षांचे महत्त्व वाढल्याने शिक्षणातील कला विषयांचे महत्त्व कमी झाले. मात्र, आता येत्या काळात चित्र बदलू शकते. राष्ट्रीय पुरस्कार मिळाल्याचा आनंद आहे, असे डॉ. जगदाळे यांनी सांगितले. विशेष म्हणजे, डॉ. जगदाळे यांनी बारावीतील अंध मुलांसाठी ब्रेल लिपीतून पुस्तके तयार केली आहेत.

डॉ. शेख यांनी मुलींच्या शिक्षणासाठी महत्त्वपूर्ण काम केले आहे. विशिष्ट समाजाच्या मुली सातवीनंतर शाळेत येत नव्हत्या. पालकांशी संवाद साधल्यावर शाळा दूर असल्याचे कारण पुढे आले. त्यामुळे शाळा व्यवस्थापन समिती, ग्रामस्थांशी चर्चा करून मुलींच्या वस्तीमध्ये चार खोल्या भाड्याने घेऊन वर्ग सुरू करण्यात आले. त्यामुळे २०१६ पासून आतापर्यंत दोन हजार मुली दहावी उत्तीर्ण झाल्या. परिणामी, बालविवाहाचे प्रमाण कमी झाले. त्याशिवाय मुली आणि महिलांसाठी पाच लाखांहून अधिक सॅनिटरी पॅड्स त्यांनी उपलब्ध करून दिले. शाळेची पटसंख्या आजही टिकून आहे.

## विवाहित मुलीसह प्रियकराचे हातपाय बांधून विहिरीत ढकलून हत्या

■ **महासागर प्रतिनिधी, नांदेड, दि. २६ :**

आपल्या विवाहित मुलीला आणि तिच्या प्रियकराला मारहाण करत हातपाय बांधून विहिरीत ढकलून त्यांची हत्या केल्याचा प्रकार उमरी तालुक्यातील गोळेगाव येथे सोमवार (दि.२५) रोजी रात्री उशिरा घडला. या घटनेमुळे एकच खळबळ उडाली असून उमरी पोलिसांनी मुलीच्या वडलांसह तिघांना ताब्यात घेतले आहे.

नांदेडच्या उमरी तालुक्यातील बोरजुनी येथील संजीवनी सुरणे (वय १९) हिचा विवाह एक वर्षापूर्वी गोळेगाव येथील एका तरुणासोबत थाटामाटात झाला होता. लग्नापूर्वी संजीवनी हिचे बोरजुनी गावातील लखन बालाजी भंडारे (वय २०) या तरुणासोबत प्रेमसंबंध होते. या दोघांनीही लग्नाचा निर्धार केला होता; पण घरच्यांचा विरोध व वेगवेगळ्या जातीचे असल्याने त्यांचा हा निर्धार यशस्वी झाला नाही. एक वर्षापूर्वी संजीवनी हिचे लग्न झाले; पण लग्नानंतरही तिचे लखन भंडारेसोबतचे प्रेमसंबंध कायम होते.

सोमवारी लखन हा संजीवनीला भेटण्यासाठी गोळेगाव येथे तिच्या सासरी आला. या दोघांना एकत्र बघून संजीवनीच्या सासरच्या मंडळींनी वडील मारोती सुरणे यांना ही माहिती सांगितली व मुलीला माहेरी परत घेऊन जाण्यास सांगितले. मारोती सुरणे त्याचे बंधू तसेच संजीवनीचे आजोबा हे गोळेगाव येथे पोहचले. हे तिघे लखन भंडारे व संजीवनीला सोबत घेऊन पायी चालत गावाच्या बाहेर निघाले. त्यानंतर रस्त्यामध्ये त्या दोघांना विचारणा करत प्रियकर लखन भंडारे व जन्मदात्या विवाहित मुलीच्या हाता-पायांना बांधून गोळेगाव-बोरजुनी मार्गावर असलेल्या करकाळा येथील एका ४० फूट खोल पाण्याने भरलेल्या विहिरीत ढकलून त्यांची हत्या केली.

या घटनेनंतर संजीवनीचे वडील पोलीस ठाण्यात स्वतःहून दाखल झाले आणि गुन्ह्याची कबुली दिली. त्यानंतर तपासाची चक्रे वेगाने फिरली. दोघांचे मृतदेह काढण्यासाठी ग्रामस्थांच्या मदतीने पोलिसांनी प्रयत्न सुरू केले. प्रारंभी संजीवनीचा मृतदेह आढळला व त्यानंतर लखन भंडारे याचाही मृतदेह शोधण्यात पोलिसांना यश आले. मंगळवारी सकाळी उत्तरीय तपासणी व कायदेशीर सोपस्कार पूर्ण केल्यानंतर संजीवनी हिच्यावर गोळेगाव येथे तर लखन भंडारे याच्यावर बोरजुनी येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

या प्रकरणात रात्रीच पोलिसांनी संजीवनीचे आजोबा लक्ष्मण सुरणे, वडील मारोती सुरणे आणि काका माधव सुरणे यांना ताब्यात घेतले. तसेच संजीवनीच्या सासरच्या मंडळींनाही मंगळवारी पोलिसांनी चौकशीसाठी बोलावले. या सर्वांची चौकशी सुरू असून अटक करण्यात आलेल्या तीन आरोपींना न्यायालयासमोर उभे केले असता न्यायालयाने त्यांना पोलीस कोठडी सुनावली आहे.

## नांदेडच्या पूरग्रस्तांकडे काँग्रेसची कूच २८ ऑगस्टला समितीचा दौरा

**मुंबई :** नुकत्याच झालेल्या अतिवृष्टीमुळे सर्वाधिक फटका बसलेल्या नांदेड जिल्ह्यातील शेतकरी आणि नागरिकांचे हाल पाहण्यासाठी काँग्रेस पक्ष सज्ज झाला आहे. उभी पिकं वाहून गेली, शेतकऱ्यांचे प्रचंड नुकसान झाले आणि ग्रामीण भागात दैन्याचे चित्र निर्माण झाले आहे. या पार्श्वभूमीवर प्रदेश काँग्रेस अध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांच्या सूचनेवरून नांदेड जिल्ह्यातील पूरग्रस्त भागाच्या पाहणीसाठी विशेष समिती गठीत करण्यात आली आहे. ही समिती गुरुवार, दिनांक २८ ऑगस्ट २०२५ रोजी नांदेड जिल्ह्यातील मुखेड तालुक्याला भेट देणार असून, प्रत्यक्ष परिस्थितीचा आढावा घेऊन प्रदेश काँग्रेसकडे अहवाल सादर करणार आहे. त्यानंतर शेतकऱ्यांना व नागरिकांना योग्य नुकसान भरपाई मिळावी, यासाठी पक्ष सरकारकडे जोरदार पाठपुरावा करणार आहे. काँग्रेस कार्यसमितीचे सदस्य व गोव्याचे प्रभारी माणिकराव ठाकरे यांच्या अध्यक्षतेखाली ही ११ सदस्यीय समिती कार्यरत राहणार आहे. या समितीत खासदार रविंद्र चव्हाण, माजी खासदार तुकाराम रेंगे पाटील, नांदेड दक्षिण ग्रामीण काँग्रेस जिल्हाध्यक्ष हनमंतराव बेटमोगरेकर, नांदेड उत्तर ग्रामीण जिल्हाध्यक्ष राजेश पावडे, प्रदेश उपाध्यक्ष यशपाल भिंगे, सरचिटणीस डॉ. दिनेश नखाते, अॅड. सुरेंद्र घोडजकर, श्रावण रॅपनवाड, रेखा चव्हाण आणि सचिव धनराज राठोड यांचा समावेश आहे.

## स्वच्छता मोहिमेत महाराष्ट्र आघाडीवर

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. २६ :**

देशातील शहरी स्वच्छतेचा ध्यास घेऊन केंद्र सरकारने सुरु केलेल्या उपक्रमांना महाराष्ट्राने दमदार साथ दिली आहे. स्वच्छता ही सेवा पंधरवडा यशस्वी करण्यासाठी राज्य सरकार कटिबद्ध असल्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी स्पष्ट केले. केंद्रीय शहरी विकास मंत्री मनोहर लाल खट्टर यांनी दूरदृश्य प्रणालीद्वारे घेतलेल्या बैठकीत महाराष्ट्राने राबवलेल्या उपक्रमांचा विशेष उल्लेख केला. २०१४ मध्ये प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी सुरु केलेले स्वच्छ भारत अभियान लोकचळवळ झाल्याचे सांगत शिंदे यांनी मुंबईत राबवलेल्या डीप क्लीन ड्राईव्ह, शून्य कचरा शहरे, सार्वजनिक शौचालयांचे सुशोभिकरण, बांधकाम व पाडकाम कचरा व्यवस्थापन यांसारख्या उपक्रमांचा तपशील मांडला. राज्यातील ३५८ शहरांसाठी मलनिस्सारण प्रकल्प, २०० मैला उपसा वाहने, तसेच डम्पिंग ग्राऊन्डवरील बायो मायनिंग प्रकल्प यासह ३३७ स्थानिक स्वराज्य संस्थांच्या घनकचरा व्यवस्थापन उपक्रमांना गती देण्यात आली आहे.

## बंडगार्डन रस्त्यावर दुचाकी विक्री दालनात आग

■ **महासागर प्रतिनिधी, पुणे, दि. २६ :**

बंडगार्डन रस्त्यावरील दुचाकी विक्री दालन, तसेच दुरुस्ती केंद्रात सोमवारी रात्री आग लागली. आगीत ६० दुचाकी जळाल्या. अग्निशमन दलाच्या जवानांनी घटनास्थळी धाव घेऊन आग आटोक्यात आणली. दालनात अडकलेल्या एकाला जवानांनी सुखरुप बाहेर काढले. आगीत दालनातील साहित्या, टेबल, खुर्ची, तसेच कागदपत्रे जळाली. आगीमागचे निश्चित कारण समजू शकले नाही.

## गणेशोत्सवासाठी सुरक्षा यंत्रणा सज्ज

### ७ हजार पोलिस, १३० सीसीटीव्ही कॅमेरे तैनात

■ **महासागर प्रतिनिधी पुणे, दि. २६ :**




पुणेकरांच्या दृष्टीने जिव्हाळ्याचा सोहळा असलेला श्री गणेशोत्सव २०२५ यंदाही दिमाखात साजरा होणार आहे. २७ ऑगस्ट ते ६ सप्टेंबर या कालावधीत होणाऱ्या या उत्सवात ३९५९ सार्वजनिक गणेश मंडळे आणि तब्बल ७४,५९४ खाजगी गणेशमूर्तींची प्रतिष्ठापना होणार आहे. पुण्याच्या परंपरेतील हा उत्सव पाहण्यासाठी पुणे शहर, ग्रामीण भाग, तसेच इतर जिल्ह्यांतून लाखो भाविकांचा लोंढा उसळणार आहे. या पार्श्वभूमीवर पुणे पोलीस दलाने व्यापक सुरक्षा नियोजन केले आहे. १३० हून अधिक सीसीटीव्ही कॅमेरे, एआय-पॉवर्ड व्हिडिओ अॅनालिटिक्स, ड्रोनद्वारे एरियल सर्व्हिलन्स, जीपीएस ट्रॅकिंग, अँटी-ड्रोन गन्स, ५० मेटल डिटेक्टर गेट्स, १५० हँड-हेल्ड डिटेक्टर्स अशी अत्याधुनिक यंत्रणा तैनात केली जाणार आहे. महिलांच्या सुरक्षेसाठी स्वतंत्र पथके, अँटी-चेन स्नॅचिंग, मोबाईल व वाहन चोरी प्रतिबंधक दल, गुन्हे शाखेचे विशेष पथक उत्सवभर गस्त घालणार आहे. ६ सप्टेंबर व ७ सप्टेंबर रोजीच्या भव्य मिरवणुकीदरम्यान सुमारे ७,००० पोलीस कर्मचारी, ११०० होमगार्ड, एसआरपीएफ कंपनी यांचा फौजफाटा रस्त्यावर असेल.

यावर्षीचा उत्सव राज्य महोत्सव म्हणून साजरा केला जात असून, शहरातील निवडक चौकांवर विद्युत रोषणाई, पोलीस बँडचे सादरीकरण, प्रशिक्षित श्वानांचे डॉग शो अशी विशेष आकर्षणे असतील. ध्वनीप्रदूषण नियंत्रणासाठी कडक अंमलबजावणी, २७ ऑगस्ट व ६ सप्टेंबर रोजी मद्यविक्रीवर संपूर्ण बंदी, तसेच मेट्रो स्थानकांवर गर्दी नियंत्रणासाठी विशेष नियोजन करण्यात आले आहे.

पुणे पोलिस आयुक्त अमितेश कुमार यांनी आवाहन केले आहे, गणेशोत्सव हा पुण्याचा सन्मान आहे. नागरिकांनी पोलीस प्रशासनास सहकार्य करून हा सोहळा सुरक्षित, शांततामय आणि अविस्मरणीय बनवावा.

## मराठवाड्यात आरोग्य क्रांतीची नवी सुरुवात

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. २६ :**

मराठवाड्याच्या आरोग्यसेवेत लवकरच मोठा बदल होणार असल्याचे संकेत मिळत आहेत. ग्रामीण रुग्णांना शहरातील तज्ज्ञ सेवा मिळाव्यात यासाठी राज्य सरकारने ऐतिहासिक निर्णयाच्या दिशेने पाऊल टाकले आहे.

अंबाजोगाई येथे तब्बल १ हजार १५० खाटांचे सुसज्ज शासकीय रुग्णालय उभारण्यात येणार असल्याची माहिती उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी मंत्रालयात घेतलेल्या बैठकीत दिली. केवळ रुग्णालय नव्हे, तर स्वामी रामानंद तीर्थ ग्रामीण वैद्यकीय महाविद्यालयालाही नव्या उंचीवर नेण्याचे आदेश त्यांनी अधिकाऱ्यांना दिले. देशातील पहिले ग्रामीण वैद्यकीय महाविद्यालय म्हणून ओळख असलेल्या या संस्थेचे रूपांतर आदर्श शासकीय महाविद्यालय करण्याचा सरकारचा मानस आहे. निधीची कमतरता भासू देणार नाही.

## अंबेजोगाई येथे १ हजार १५० खाटांचे रुग्णालय उभारावे : उपमुख्यमंत्री अजित पवार

■ **महासागर प्रतिनिधी मुंबई, दि. २६ :**

मराठवाड्यातील ग्रामीण भागासाठी वैद्यकीय शिक्षण व आरोग्यसेवा अधिक सक्षम व्हावी, यासाठी बीड जिल्ह्यातील अंबाजोगाई येथे १ हजार १५० खाटांचे सुसज्ज शासकीय रुग्णालय उभारण्यात यावे. तसेच स्वामी रामानंद तीर्थ ग्रामीण वैद्यकीय महाविद्यालयाचे काम दर्जेदार पद्धतीने करावे, अशा सूचना उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी दिल्या.



स्वामी रामानंद तीर्थ ग्रामीण वैद्यकीय महाविद्यालयाच्या कामाबाबत उपमुख्यमंत्री पवार यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रालयात आज बैठक झाली. या बैठकीस वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुश्रीफ, वित्त विभागाचे अपर मुख्य सचिव ओ. पी. गुप्ता, नियोजन विभागाचे अपर मुख्य सचिव राजगोपाल देवरा, वैद्यकीय शिक्षण विभागाचे सचिव धीरज कुमार, वित्त विभागाच्या सचिव शैला ए, संचालक डॉ. अजय चंदनवाले, अधिष्ठाता डॉ.शंकर धपाटे, उपमुख्यमंत्र्यांचे सचिव राजेश देशमुख यांच्यासह संबंधित वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

देशातील पहिले ग्रामीण वैद्यकीय महाविद्यालय म्हणून ओळख असलेल्या अंबाजोगाईच्या स्वामी रामानंद तीर्थ ग्रामीण वैद्यकीय महाविद्यालयाचे रूपांतर आदर्श शासकीय संस्थेमध्ये करण्यात यावे असे सांगून उपमुख्यमंत्री पवार म्हणाले की, या महाविद्यालयासाठी निधीची कमतरता भासू दिली जाणार नाही. महाविद्यालयाच्या आधीच सुरू असलेल्या व पूर्ण झालेल्या कामांचा समावेश करून नवीन मास्टर प्लॅन तयार करावा. नवीन रुग्णालयात आधुनिक सुविधा, सुपर स्पेशालिटी सेवा यांचा समावेश असावा, उत्कृष्ट सुविधा असाव्यात.

मराठवाड्यासाठी हे महाविद्यालय महत्वाचे असून येथे येणाऱ्या रुग्णांची संख्या मोठी आहे. त्यामुळे येथे सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल उभारण्याचा प्रस्ताव सादर करावा. हे काम लवकरात लवकर पूर्ण करावे, सध्या अस्तित्वातील इमारतींचा नियोजनपूर्वक वापर करावा, अशा सूचना उपमुख्यमंत्री पवार यांनी दिल्या.

वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुश्रीफ यांनी सांगितले की, अंबाजोगाईतील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाचा दर्जा उंचावण्यासाठी कार्यवाही वेगाने करावी. महाविद्यालयाचा आराखडा तयार करून, कार्यवाही करावी.

मराठवाडा विभागातील लोकसंख्येसाठी ही वैद्यकीय सुविधा म्हणजे एक मोठा दिलासा ठरणार आहे. शासकीय वैद्यकीय महाविद्यालयामुळे स्थानिक विद्यार्थ्यांना वैद्यकीय शिक्षणासाठी नवीन संधी मिळणार असून, ग्रामीण भागातील रुग्णांना तज्ज्ञ सेवांचा लाभ मिळणार आहे.

## दुचाकी दगडावर आदळून एक ठार; दोन जण जखमी

**गडचिरोली :** मुलचेरावरून आष्टीकडे येताना भरधाव दुचाकी रस्त्यालगतच्या दगडावर आदळली. यात एक ठार तर दोघे जखमी झाल्याची घटना मार्कंडा फाटो ते मुलचेरा या दरम्यान २५ ऑगस्ट रोजी सायकाळी सहा वाजताच्या सुमारास घडली. लवकुश सदाधिव गोरडवार (३१) रा. नांदगाव घोसरी, ता. पोंभुर्णा जि. चंद्रपूर असे मयताचे नाव असून अक्षय राजेश्वर वाकुडकर (२७) रा. नांदगाव घोसरी, शुभम सखाराम वाकुडकर (३०) रा. गांडाळा, ता. मुल यांचा जखमीत समावेश आहे.

प्राप्त माहितीनुसार सदर तिघेहीजण एमएच ३४ बीडब्ल्यू ४९०९ या क्रमांकाच्या दुचाकीने मुलचेरावरून आष्टीकडे येत होते. दरम्यान मार्कंडा फाटो ते मुलचेरा मार्गावर ६ किमी अंतरावर दुचाकी दगडावर आदळून अनियंत्रित होवून अपघात झाला. झालेल्या अपघातात जखमी झालेल्यांना ग्रामीण रूग्णालयात उपचार करून प्रकृती गंभीर असल्याने दोघांना चंद्रपूर येथे हलविण्यात आले. ते उपचार सुरू आहेत. घटनेचा तपास आष्टीचे पोलिस निरीक्षक विशाल काळे यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू आहे.

# आरक्षणात अन्याय खपूवन घेणार नाही

**तहसिलदारांना निवेदन: ढिवर समाजाने दिला बेमुदत ठिय्या आंदोलनाचा इशारा**




**प्रतिनिधी**
**गडचिरोली दि. २६ :** सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागासवर्गाच्या आरक्षणासह सुधारित आरक्षण व बिंदू नामावली विहित करतांना गडचिरोली जिल्ह्यात मोठ्या संख्येने असलेल्या पारंपारिक मच्छिमार ढिवर - भोई, केवट, कहार, बेस्ता, ओडेवार इत्यादी भटक्या जमाती ब प्रवर्गाचे आरक्षण कमी करण्यात आले आहे. सदरचे आरक्षण शासनाने तातडीने पूर्ववत करावे, अन्यथा ढिवर - भोई, केवट व तत्सम जमाती समाजाच्या वतीने गडचिरोली जिल्हाधिकारी कार्यालयावर भव्य मोर्चा व बेमुदत ठिय्या आंदोलन सुरू करण्यात येईल, असा इशारा गडचिरोली तालुका ढिवर - भोई व तत्सम जमाती संघटनेच्या वतीने शासनाला देण्यात आला.

गडचिरोली तालुका ढिवर - भोई व तत्सम जमाती संघटनेच्या वतीने नायब तहसीलदार चंदू प्रधान यांना याबाबतचे निवेदन दिले. या निवेदनात म्हटले आहे की, सदर शासन निर्णयान्वये गडचिरोली जिल्ह्यातील जिल्हास्तरीय गट - क व गट - ड संवर्गातील पदांसाठी सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागासवर्गाच्या (एसईबीसी) आरक्षणासह सुधारित आरक्षण व बिंदू नामावली विहित करताना भटक्या जमाती - ब चे आरक्षण २.५ टक्क्यावरून कमी करून ते २ टक्के करण्यात आलेले आहे. तसेच विमुक्त जाती / भटक्या जमाती या प्रवर्गाची प्रचलित आरक्षणाची टक्केवारी व प्रवर्गाची असलेली लोकसंख्या विचारात घेतल्याचे नमूद आहे. गडचिरोली जिल्ह्यातील भटक्या जमातींची लोकसंख्या कमी असल्याचे भासवून असलेले आरक्षण कमी करण्याचे काम शासनाने करून मोठ्या संख्येने गडचिरोली जिल्ह्यात असलेल्या भटक्या जमाती - ब प्रवर्गावर अन्याय केला असल्याची टिका गडचिरोली तालुका ढिवर भोई व तत्सम जमाती संघटनेने केली आली आहे. जिल्ह्यातील जवळपास सर्वच गावात पारंपारिक मच्छिमार असलेल्या आमच्या ढिवर, भोई ,केवट इत्यादी समाजाची स्वतंत्र वस्ती/ मोहल्ले असून माडिया - गोंड, कुणबी - तेली या समाजाच्या बरोबरीने लोकसंख्या अस्तित्वात आहे. अत्यंत हलाखीच्या परिस्थितीत शिक्षण, नोकरीविना दारिद्रयात खितपत पडलेल्या आमच्या समाजाला शाश्वत प्रगतीची संधी मिळावी, म्हणून किमान ५ टक्के आरक्षण मिळावे यासाठी आमच्या समाजाची अनेक वर्षापासूनची मागणी असताना या शासन निर्णयान्वये आमच्या समाजाचे आरक्षण उलट कमी करून २ टक्क्यांवर आणून समाजाला विकासाच्या मुख्य प्रवाहा बाहेर करण्याचे काम सध्याच्या सरकारने केले, असा आरोपही संघटनेने केला आहे.

निवेदन देतांना जिल्हा सचिव किशोर बावणे, जयश्री जराते, गडचिरोली तालुका ढिवर - भोई व तत्सम जमाती संघटनेचे तालुकाध्यक्ष देवेंद्र भोयर, तालुका उपाध्यक्ष चंद्रकांत भोयर, तालुका सचिव योगेश चापले, विनोद मेश्राम, किसन साखरे, रमेश गेडाम, प्रभाकर मेश्राम, रामचंद्र मानकर, काशिनाथ मेश्राम, महेश शिंदे, रामदास दाणे, संतोष गेडाम, मधुकर भोयर, कुकसू हजारे, सदाशिव साखरे, कालिदास शेरकी, तरकडू भोयर यांच्यासह शेकडो समाज बांधव उपस्थित होते.

## गडचिरोली विकासातील अग्रणी जिल्हा बनवणार!

**जिल्हा वर्धापनदिनानिमित्त मुख्यमंत्री फडणवीस यांच्या शुभेच्छा**

**प्रतिनिधी**
**गडचिरोली दि. २६ :** बरेच काही करतो आहे आणि आणखी खूप काही करायचे आहे. हा आमच्यासाठी राज्यातील शेवटचा नाही, तर पहिला जिल्हा आहे. गडचिरोलीला विकासातील अग्रणी जिल्हा बनवू, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी म्हटले आहे.



गडचिरोली जिल्हा निर्मितीला २६ ऑगस्ट रोजी ४३ वर्ष पूर्ण होत आहेत, त्यानिमित्त मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी जिल्हावासियांना शुभेच्छा दिल्या आहेत. हा जिल्हा गेली अनेक दशके विकासापासून वंचित राहिला. पण, २०१४ पासून आम्ही त्याला विकासाच्या केंद्रस्थानी आणले. गडचिरोलीला माओवादापासून मुक्त करणे आणि तो उद्योग, शिक्षण, रोजगार, पायाभूत सुविधायुक्त करणे, याला आमचे सर्वोच्च प्राधान्य राहिले. आज अर्धा गडचिरोली जिल्हा माओवादमुक्त झाला. केंद्रीय गृहमंत्री अमितभाई शहा यांनी मार्च २०२६ पर्यंत संपूर्ण देश माओवादमुक्त करण्याचा जो निर्धार केला आहे, त्यादिशेने आम्ही काम करतो आहोत, असेही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी म्हटले आहे.

आमचे गडचिरोलीचे पोलिस, सी-६० जवानांसह यात मोठा वाटा देत आहेत. पोलिस दादालोरा खिडकीसारख्या उपक्रमांनी पोलिस या विकास प्रक्रियेतील अग्रदूत बनले आहेत. गडचिरोलीला देशातील पोलाद सिटी बनविण्याच्या दिशेने आम्ही अतिशय गतीने पाऊले टाकली आहेत. सुमारे १ लाख कोटींची गुंतवणूक ही गडचिरोली जिल्ह्यात येत आहे. हे करीत असताना गडचिरोलीचे जल, जमीन, जंगल आणि पर्यावरण राखण्यावर आमचा तितकाच भर आहे. मेडिकल कॉलेज असो, विमानतळ असो, रेल्वेमार्ग असो, रस्त्यांची कामे असो, शिक्षणाच्या सुविधा अशा सर्वच दिशांनी आज गडचिरोली जिल्हा भक्कम प्रगती करतो आहे. अर्थात यात गडचिरोली जिल्ह्यातील नागरिकांचीही तितकीच भक्कम साथ लाभते आहे आणि त्यांच्यामुळेच ही विकास प्रक्रिया गतिमान झाली आहे. सर्व जिल्हावासियांना गडचिरोली जिल्हा स्थापनादिनाच्या मनःपूर्वक शुभेच्छा, असे देवेंद्र फडणवीस यांनी म्हटले आहे.

## अहेरी न.पं.वर माहिती अधिकाराच्या पायमल्लीचा आरोप

**अर्जदाराची अपर जिल्हाधिकाऱ्यांकडे तक्रार**




**तालुका प्रतिनिधी**
**अहेरी दि. २६ :** अहेरी नगर पंचायतीमध्ये माहिती अधिकार कायद्याची पायमल्ली होत असल्याचा गंभीर आरोप एका अर्जदाराने केला आहे. वारंवार अर्ज करूनही माहिती दिली जात नसल्याने अर्जदार सुदामा हलदार (माहिती अधिकार महासंघ सह प्रचारक अहेरी तालुका) यांनी थेट अपर जिल्हाधिकारी, गडचिरोली यांच्याकडे तक्रार केली असून, संबंधित जन माहिती अधिकाऱ्यावर भ्रष्टाचाराचे आरोपही केले आहेत.

सुदामा हलदार यांनी दिलेल्या माहितीनुसार, त्यांनी नगरपंचायतीच्या कामकाजासंबंधी माहिती मिळवण्यासाठी ०१/०१/२०२५, २३/०६/२०२५, २९/०७/२०२५, ०४/०८/२०२५, आणि १८/०८/२०२५ या विविध तारखांना अर्ज दाखल केले होते. मात्र, अहेरी नगर पंचायतीचे जन माहिती अधिकारी व प्रशासकीय अधिकारी वैभव पांढरे यांनी जाणीवपूर्वक कोणतीही माहिती उपलब्ध करून दिली नाही, असा आरोप सुदामा हलदार यांनी केला आहे. या माहिती अधिकाराच्या अर्जांना उत्तर देण्याऐवजी, वैभव पांढरे यांनी स्वतःच्या बदलीसाठी अर्ज दाखल केला आहे. हा बदली अर्ज केवळ आपली जबाबदारी टाळण्यासाठी आणि नगरपंचायतीमध्ये कोट्यवधी रुपयांच्या गैरव्यवहारावर पांघरूण घालण्यासाठी केला असल्याचा दावा अर्जदार सुदामा हलदार यांनी आपल्या तक्रारीत केला आहे. त्यामुळे, कायद्यानुसार हा बदली अर्ज तात्काळ नाकारण्यात यावा, अशी मागणीही त्यांनी केली आहे.

या गंभीर प्रकरणात, महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे जिल्हा उपाध्यक्ष सोनल वाकुलकर आणि सुदामा हलदार यांनी अपर जिल्हाधिकारी यांच्याकडे तीन प्रमुख मागण्या केल्या आहेत. ज्यात जन माहिती अधिकाऱ्याचा बदली अर्ज तात्काळ नामंजूर करण्यात यावा. दाखल केलेल्या माहिती अधिकार अर्जांवर तातडीने कारवाई करून सर्व माहिती उपलब्ध करून द्यावी. माहिती लपवण्याचा प्रयत्न करणाऱ्या जन माहिती अधिकाऱ्यावर उच्चस्तरीय समिती नेमून सखोल चौकशी करण्यात यावी, अशी मागणी केली आहे. या तक्रारीमुळे, अहेरी नगर पंचायतीच्या कामकाजावर प्रश्नचिन्ह निर्माण झाले असून, आता अपर जिल्हाधिकारी यावर काय भूमिका घेतात याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

## स्कुल व्हॅनची दुचाकीचा धडक, एक ठार: महिला गंभीर

**गडचिरोली :** दुचाकीस्वाला स्कूल व्हॅनने मागून धडक दिल्याने एक ठार तर महिला गंभीर जखमी झाल्याची घटना गडचिरोली शहरापासून दोन किमी अंतरावर असलेल्या धानोरा मार्गावरील एसओएस शाळेजवळ सोमवार २५ ऑगस्ट रोजी सकाळी ८ वाजताच्या सुमारास घडली. सोमेश्वर नागोसे (४२) रा. इंदिरानगर गडचिरोली असे मृतकाचे तर जखमी महिलेचे नाव कळू शकले नाही.

प्राप्त माहितीनुसार सोमेश्वर हा इंदिरानगरकडून गडचिरोलीकडे कामाच्या ठिकाणी येत होता. दरम्यान एका महिलेने त्याला शहरात सोडून देण्याची विनंती केली. सदर महिला घेवून तो येत असताना स्कूल व्हनने धडक दिली. यात सोमेश्वर हा गंभीर जखमी झाल्याने त्याला नागपूर हलवून त्याच्यावर उपचार सुरू असताना त्याचा मृत्यू झाला.

## बेडगाव घातात बिबट्याचे दर्शन

**कोरची :** तालुक्यातील कुरखेडा मार्गावरील बेडगाव घाटात वन्यप्राण्याचे दर्शन नेहमीच होते. अतिशय अरूंद, वळणावळणाचा व चढ-उताराचा हा घाट घनदाट झाडी, उंच पहाडीने वेढलेला आहे. २४ ऑगस्ट रोजी सकाळी साडेदहा वाजता कोरचीतील एक कुटुंब या घाटातून जात होते. घाटातील मोठ्या चढावर पोहोचल्यावर झुडपाजवळ बिबट्या निवांत बसलेला होता.


पत्र क्र.कार्या/स.म.अ./जमीन/कावी/ ११४५//२०२५

### जाहीर सुचना

या जाहीरातीद्वारे सर्व लोकांना सुचीत करण्यात येत आहे की, कार्यकारी अभियंता, राष्ट्रीय महामार्ग विभाग, गडचिरोली यांनी अहेरी तालुक्याअंतर्गत राष्ट्रीय महामार्ग क्रमांक १३०D वरील आलापल्ली ते भामरागड दरम्यानचा कि.मी. १७८+२४० पासून कि.मी. १७९+४१५ पर्यंतचा भागात पेरमिली पुलाच्या पोच मार्गाच्या कामासाठी मौजा पेरमीली येथील खाजगी जमीन सार्वजनिक प्रयोजनार्थ NH Act १९५६ अन्वये भुसंपादनाची कार्यवाही करीता खाजगी वाटाघाटीद्वारे व थेट पध्दतीने कार्यकारी अभियंता, राष्ट्रीय महामार्ग विभाग, गडचिरोली यांचे नावे संपादन करण्याचे प्रस्तावीत आहे. सदर भुसंपादनाची राष्ट्रीय महामार्ग अधिनियम १९५६ नुसार ३ (D) अधिसुचना राजपत्र दिनांक १३ अगस्त, २०२५ रोजी प्रसिध्द झालेली आहे.

१. खालील सुची मध्ये जमीन मालकांचे नाव, गावाचे नाव, भुमापन क्रमांक/गट क्रमांक व संपादन करावयाचे क्षेत्र इत्यादी तपशील जाहिर सुचनाद्वारे प्रसिध्दी करीत आहे. सदर जमीनीबाबत व सदर जमीनीच्या क्षेत्राबाबत, हित. संबध, दत्तक वारसाहक्क, गहाण, दान, बोजा, थकबाकी, भाडेपट्टा, लिज, कर्ज, बक्षीसपत्र, जप्ती करार मदार, न्यायलयीन दाव्याबाबत अथवा इतर कोणताही हक्क असल्यास ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासुन ३० (तीस) दिवस किंवा दिनांक २० सप्टेंबर, २०२५ चे आंत पुरव्यानिशी लेखी तक्रार (पुराव्यानिशी) विशेष भूसंपादन अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, अहेरी, जिल्हा गडचिरोली यांचे कार्यालयात सकाळी ११.०० ते सायंकाळी ३.०० वाजेपर्यंत स्वतः अथवा रजिष्टर पोष्टाने सादर करावे.

२. जर विहीत मुदतीत प्रस्तावीत जमिनीबाबत कोणीही हक्क, हितसंबंध किंवा आक्षेप हरकत प्राप्त न झाल्यास, कोणाचे काहिच म्हणणे/हरकती नाही व सदर जमीन मालकाची मिळकत निर्बंध व निजोखमी असल्याचे समजुन हे कार्यालय महाराष्ट्र शासन यांच्या वतीने मुदतीनंतर केव्हाही खरेदीचा व्यवहार पुर्ण करेल. दिलेल्या मुदतीनंतर हरकत आल्यास ते कार्यालयास कायदेशीर रित्या बंधनकारक राहणार याची नोंद घ्यावी, हि खरेदी पुर्व सुचना दिली.

खासगी जमिनीचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

**आलापल्ली-भामरागड मार्ग येथे मौजा पेरमीली पुलाचा पोचमार्ग**
**गाव :- पेरमीली, तालुका अहेरी, जिल्हा गडचिरोली. (पोचमार्ग बांधकाम)**

| अ. क्र. | सर्व्हे नंबर | भूमीचा प्रकार | भुमी ची प्रकृती | क्षेत्रफळ (हेक्टर) | भुस्वामी/हितसंबंधात व्यक्तीचे नाव |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| १ | १२९/३ | निजी | कृषि | ०.१५ | रघुनाथ हनुमंत आउतकर, पत्रू हनुमंत आउतकर, सुमन बळीराम कोसरे, निर्मला विस्तारू कोसरे, कलुबाई बळीराम कोसरे, शोभा गोपाल चंदनखेडे, यमुनाबाई हनुमंत आउतकर, मल्लेश किसन बावने, अरूण सुधाकर आउतकर, भारत सुधाकर औतकर, अर्चना रमेश हजारे, सोमबाई सुधाकर आउतकर १२९/३ |
| | | एकूण | | ०.१५ हे.आर. | |

ही जाहिरात सुचना माहिती करीता प्रकाशीत करण्यात येत आहे.
दिनांक :- २१/०८/२०२५
ठिकाण :- अहेरी

(कुशल जैन, भा.प्र.से.)
विशेष भुसंपादन अधिकारी,
तथा उपविभागीय अधिकारी, अहेरी

जा.क्र.जिमाका/गड/जाहि/१४९/२०२५


## 'आप' नेते सावसाकडे यांची कंत्राटी कर्मचाऱ्यांच्या संपाला भेट



**प्रतिनिधी**
**गडचिरोली दि. २६ :** येथील सामान्य रुग्णालयच्या आवारात १९ ऑगस्ट पासून सुरू असलेल्या आरोग्य विभागातील कंत्राटी कर्मचाऱ्यांच्या संपाला आम आदमी पार्टीचे नेते बाळकृष्ण सावसाकडे यांनी आकस्मिक भेट देवून त्यांच्याशी चर्चा करून मागण्या जाणून घेतल्या.

दि १४/३/२०२४ शासन निर्णयाची अंमलबजावणी करणे व सेवेत कायम करणे. अधिवेशन २०२५ च्या चर्चे नुसार मुद्दा क्रमांक ५२ नुसार निर्णय घेणे. १० वर्षापेक्षा जास्त सेवा झालेल्या कर्मचाऱ्यांना कायम करणे आदी मागण्याचे निवेदन कर्मचाऱ्यांनी सावसाकडे यांना देण्यात आले. यावळी बाळकृष्ण सावसाकडे यांनी मागण्यांना समर्थन देते सदर मागण्यांचा मुख्यमंत्री, आरोग्यमंत्री यांच्याकडे पाठपुरावा करण्याचे आश्वासन दिले.

जीतू कोटगले, नरेंद्र म्हाशाखेत्री, भास्कर इंगळे, जाणिकराव ननावरे, संतोष कोटकर, केशव सातपुते, हरिदास सेलोटे, अनिल बाळेकरमकर, हेमंत चामलवार, धीरज सेलोटे, मनीषा चौधरी, वैष्णवी चौधरी, सारिका तिजारे, अश्विनी डोईजड, प्रणय लाकुडवाहे, मनोज तिजारे आदी शेकडोच्या संख्येने कंत्राटी कर्मचारी उपस्थित होते.

## आरमोरीत वरिष्ठ छायाचित्रकारांचा सन्मान

आरमोरीः फोटोग्राफर असोसिएशनच्यावतीने छायाचित्रण दिन आगळ्यावेगळ्या पद्धतीने साजरा करण्यात आला. शेगावचे गजानन महाराज यांच्या चरणी नतमस्तक होत हा दिवस साजरा करण्यात आला. छायाचित्रण दिनानिमित्त शहरातील दुकाने बंद ठेवण्यात आली. वरिष्ठ फोटोग्राफरचा शाल व श्रीफळ देऊन गौरव करण्यात आला. यावर्षी शेगाव दर्शन व शेगाव येथे उत्कृष्ट फोटो काढणाऱ्या फोटोला बक्षीस देण्यात आले. यावेळी आरमोरी तालुका फोटोग्राफर असोसिएशनचे अध्यक्ष अरविंद मने, उपाध्यक्ष एकनाथ गजपुरे, कोषाध्यक्ष सुमित वनवे, सचिव प्रफुल खापरे, सहसचिव लिलेस सहारे, प्रमुख मार्गदर्शक अतुल मने, गुरुदेव लोखंडे, रणजित बनकर, अमर लोखंडे, गणेश वनवे, किशोर कळस्कर, शरद तोंडरे, हेमंत कोकोडे, राकेश नंदनवार, कमलेश सोनकुसरे, ज्ञानेश्वर दोनाडकर, मिथुन येनुगवार, विक्की कुंभारे आदी उपस्थित होते.


**उत्तराधिकारी प्रमाणपत्राबद्दल जाहिरनामा**

पेशी तारीख - २५/०९/२०२५

निशाणी क्रमांक : ०७

**कोर्ट विद्यमान श्रीमती व्ही.आर. मालोदे, सह दिवाणी न्यायाधिश (क.स्तर), गडचिरोली यांचे न्यायालय**

एम.जे.सी. क्रमांक -१७१/२०२५

ज्यापेक्षा मय्यत मुक्ताबाई लक्ष्मण ठाकरे हे तारीख ०३ माहे जुलै सन २०२५ रोजी हे मरण पावले असून त्यांचे वारसान अनुक्रमः-

**अर्जदारः** १) श्री. वामन लक्ष्मण ठाकरे , वय-६० वर्षे, धंदा - शेती, २) श्री. प्रभू उर्फ प्रभाकर लक्ष्मण ठाकरे, वय- ५७ वर्षे, धंदा- शेती, ३) श्री. जालिंद्र लक्ष्मण ठाकरे, वय-५२ वर्षे, धंदा- शेती, सर्व रा. विसापूर, पोस्ट-पारडी कुपी, ता. जि. गडचिरोली.

-: विरूध्द :-

**गैरअर्जदार :-** निरंक

वरील अर्जदार यांनी या कोर्टास सदरहू मय्यत मुक्ताबाई लक्ष्मण ठाकरे यांचे कायदेशीर वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र मिळावे असा अर्ज केला आहे.

त्यापेक्षा सदरहू मय्यताचे कोणीही नव्हे असे कोणास समजाविण्याचे असेल तर ह्या जाहीरनाम्याचे तारखेपासून एक महिण्याचे आत त्याने ह्या कोर्टात हजर होऊन आपल्या हरकती कळवावे, आणि ह्या लेखावरून असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणीही योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहू कोर्ट सदरहू अर्जदार ह्यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेऊन त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहू मय्यत मुक्ताबाई लक्ष्मण ठाकरे यांचे उत्तराधिकारी प्रमाणपत्र देईल.

सबब जाहीर नोटीस दिनांक २० ऑगस्ट, २०२५ रोजी माझ्या सही व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

**सहाय्यक अधिक्षक**
**सह दिवाणी व फौजदारी न्यायालय**
**गडचिरोली**

**उत्तराधिकारी प्रमाणपत्राबद्दल जाहिरनामा**

पेशी तारीख - ३०/०९/२०२५

निशाणी क्रमांक : ९

**कोर्ट विद्यमान श्रीमती व्ही.व्ही. चौधरी, दिवाणी न्यायाधिश (कनिष्ठ.स्तर), आरमोरी यांच्या न्यायालयात**

किरकोळ अर्ज क्रमांक -२९/२०२५

**अर्जदारः** १) श्रीमती अश्विनी अमित टेंभुर्णे, वय-३६ वर्षे, धंदा - घरकाम, २) कु. तक्ष अमित टेंभुर्णे, वय- ९ वर्षे, धंदा- शिक्षण, ३) कु. नम्र अमित टेंभुर्णे, वय-१.५ वर्षे, धंदा- अज्ञात, अर्जदार क्र. २ व ३ तर्फे अ.पा.क. आई श्रीमती अश्विनी अमित टेंभुर्णे. ४) श्रीमती हेमलता दुष्यत टेंभुर्णे, वय - ६५ वर्षे, धंदा- घरकाम, सर्व रा. चामोर्शी, ता. आरमोरी, जि. गडचिरोली

-: विरूध्द :-

**गैरअर्जदार :-** निरंक

सर्व आम जनतेस याद्वारे सुचित करण्यात येते की, मृतक अमित दुष्यंत टेंभुर्णे, मौजा- चामोर्शी (माल) ता. आरमोरी, जि. गडचिरोली हे दिनांक ०५/०७/२०२५ रोजी मय्यत झाले असून मृतकाचे मृत्यूपश्चात अर्जदारांना अनुकंपा तत्वावरील लाभाकरिता तथा पेंशनसंबंधी लाभाकरिता उत्तराधिकारी प्रमाणपत्र मिळण्यासंदर्भात वरील अर्जदारांनी या न्यायालयात अर्ज केलेला आहे.

वरील अर्जदारांनी केलेल्या अर्जावर कोणाची उजर वा हरकत असल्यास त्यांनी ही नोटीस प्रकाशित झाल्यापासून एक महिण्याचे आंत त्यांनी स्वतः किंवा आपले वकिलामार्फत वा योग्य मुत्यारामार्फत आपली लेखी उजर वा हरकत दाखल करावी. अन्यथा तद्नंतर हे न्यायालय सदरहू अर्जदाराचा लागलीच पुरावा घेवून उत्तराधिकारी प्रमाणपत्र मिळण्यासाठी केलेल्या अर्जावर योग्य तो निर्णय देईल.

सबब जाहीर नोटीस दिनांक २१ /०८/२०२५ रोजी माझ्या सही व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

**आदेशान्वये**
**सहाय्यक अधिक्षक**
**दिवाणी न्यायालय (क.स्तर)**
**आरमोरी**

**उत्तराधिकारी प्रमाणपत्राबद्दल जाहिरनामा**

पेशी तारीख - ३०/०९/२०२५

निशाणी क्रमांक : ७

**कोर्ट विद्यमान श्रीमती व्ही.व्ही. चौधरी, दिवाणी न्यायाधिश (कनिष्ठ.स्तर), आरमोरी यांच्या न्यायालयात**

किरकोळ अर्ज क्रमांक -२८/२०२५

**अर्जदारः** १) श्रीमती सुमन नक्टुजी बगमारे, वय-६५ वर्षे, धंदा - गृहिणी, २) सौ. कुंदा श्रावण राऊत, वय- ४७ वर्षे, धंदा- गृहिणी, ३) सौ. मंदा मुर्लीधर दिवटे, वय-३३ वर्षे, धंदा- गृहिणी, ४) श्रीमती नीता प्रमोद बगमारे, वय - ३० वर्षे, धंदा- गृहिणी, ५) कृणाली प्रमोद बगमारे, वय -१३ वर्षे, धंदा-शिक्षण, ६) गणेश प्रमोद बगमारे, वय ९ वर्षे, धंदा-शिक्षण, अर्जदार क्र. १,२ व ४ ते ६ रा. पो. जोगीसाखरा, अर्जदार क्र.३ रा. रवी, पो. अरसोडा, ता. आरमोरी, जि. गडचिरोली. अर्जदार क्र. ५ व ६ करिता अ.पा.क. आई अर्जदार क्र.४

-: विरूध्द :-

**गैरअर्जदार :-** निरंक

सर्व आम जनतेस याद्वारे सुचित करण्यात येते की, मृतक नक्टुजी हरी बगमारे, मौजा-कोरेगाव ता. आरमोरी, जि. गडचिरोली हे दिनांक १३/०४/२०२४ रोजी मय्यत झाले असून मृतकाचे मृत्यूपश्चात अर्जदारांना मिळणाऱ्या लाभाकरिता तसेच इतर शासकीय व निमशासकीय कामाकरिता उत्तराधिकारी प्रमाणपत्र मिळण्यासंदर्भात वरील अर्जदारांनी या न्यायालयात अर्ज केलेला आहे.

वरील अर्जदारांनी केलेल्या अर्जावर कोणाची उजर वा हरकत असल्यास त्यांनी ही नोटीस प्रकाशित झाल्यापासून एक महिण्याचे आंत त्यांनी स्वतः किंवा आपले वकिलामार्फत वा योग्य मुत्यारामार्फत आपली लेखी उजर वा हरकत दाखल करावी. अन्यथा तद्नंतर हे न्यायालय सदरहू अर्जदाराचा लागलीच पुरावा घेवून उत्तराधिकारी प्रमाणपत्र मिळण्यासाठी केलेल्या अर्जावर योग्य तो निर्णय देईल.

सबब जाहीर नोटीस दिनांक २१ /०८/२०२५ रोजी माझ्या सही व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

**आदेशान्वये**
**सहाय्यक अधिक्षक**
**दिवाणी न्यायालय (क.स्तर)**
**आरमोरी**



RNI No-MAHMAR 2010/35845
महासागर गडचिरोली
मालक,मुद्रक,प्रकाशक श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी अरूणोदय प्रेस, कॉटन मार्केट, नागपूर १८ येथे छापून दैनिक महासागर कार्यालय, एकदा मार्केट, चामोर्शी रोड, गडचिरोली येथे प्रकाशित केले. संपादक श्रीकृष्ण तनसुखदास चांडक मुख्य कार्यालय फोन ७४४७७३५८५१/९९२२९७००२३ स्थानिक संपादक नरेंद्र माहेश्वरी फोन ९४०५६६०५५५, ९८३४२३०४३०/०७१३२-२३२७७३ (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांचेवर राहिल.)

# उत्सव म्हणजे नाच, गाणी, डीजे नव्हे

गणेशोत्सव हे महाराष्ट्राचे वैभव आहे. गणपती ही बुध्दीची देवता आहे. महाराष्ट्रात घरोघरी गणेशाची स्थापन करून पूजन केले जाते. दिड दिवसांपासून दहा दिवसांपर्यंत घरोघरी गणेश मूतीर्ची पूजा केली जाते. गणेशोत्सवाच्या काळात कुटुंबातील सारे जण एकत्र असतात, रोज सकाळी व सायंकाळच्या आरतीला आवर्जून उपस्थित राहतात. घरोघरी गणपतीपुढे आरास, सजावट केली जाते. रोज फुले व प्रसाद ठेवला जातो. गणेशोत्सवात साऱ्या महाराष्ट्रात भक्तिमय वातावरण असते. मग रस्त्यावर साजरा होणाऱ्या सार्वजनिक गणेशोत्सवात आणि मिरवणुकांमधे धांगडधिंगा का घातला जातो? कानठळ्या बसविणाऱ्या आवाजात गाणी का लावली जातात? गणपतीपुढे हिडिस फिडिस नृत्य का केले जाते? भक्तिगीतांपेक्षा हिंदी चित्रपटातील नाच गाण्यांना वर्षाव का केला जातो ? भलेमोठे मंडप घालून रस्ते का अडवले जातात? आणि गणेशोत्सवाच्या दहा दिवसात वारेमाप खर्चाची उधळपट्टी का केली जाते ?



**स्टेटलाईन**

**डॉ. सुकृत खांडेकर**
sukritforyou@gmail.com

श्रावण महिना सुरू झाला की सण आणि उत्सवांची मालिका सुरू होते. दहिहंडीच्या दिवशी दुपारी बारा नंतर मुंबईचे अनेक रस्ते बंद होतात. गोविंदांची शेकडो पथके बसेस व ट्रक- टेम्पोमधून दहिहंडी फोडण्यासाठी मुंबई- ठाण्यात फिरत असतात. पन्नास हजारापासून पंचवीस लाखापर्यंत हंडी फोडणाऱ्या पथकांवर बक्षिसांचा वर्षाव केला जातो.

अशी मोठ मोठी बक्षिसे लावणाऱ्यांमधे राजकीय पक्षाचे नेते आणि लोकप्रतिनिधी असतात. राज्याचे अनेक आजी- माजी मंत्रीही त्यात आघाडीवर दिसतात. पुढाऱ्यांच्या छब्या असलेले टी शर्टस घालून गोविंदांची पथके मोठ्या उत्साहात फिरत असतात. आता तर नऊ आणि दहा थरांचे फोटो आणि व्हिडिओ व्हायरल होताना दिसतात.

अनेक दहिहंडी कार्यक्रमांचे वृत्तवाहिन्यांवर दिवसभर थेट प्रक्षेपण केले जाते. अनेक ठिकाणी चंदेरी दुनियेतील अभिनेते व अभिनेत्री तिथे हजेरी लावतात. मंचावर सादर होणाऱ्या नाच गाण्यांच्या कार्यक्रमात अनेक नामवंत कलाकार हजेरी लावतात. हे कलावंत तिथे येण्यासाठी किती बिदागी घेतात याच्या आकेडवारीची नेहमीच उघड चर्चा ऐकायला मिळते.

दोन पाच लाखापासून ते पंधरा वीस लाखापर्यंत हेआकडे ऐकायला मिळतात. यावर्षी दहिहंडी उत्सवात चारशे गोविंदा तरी जखमी झाले आणि चार जणांचा मृत्यु झाला. दरवर्षी तीनशे गोविंद तरी जखमी होत असतात. काहींचे मृत्यु होतात. या गोविंदाच्या घरची परिस्थिती काय असते? जखमी गोविंदांचे पुढे काय होते? त्यांना विमा कंपन्यांकडून नुकसान भरपाई मिळते काय? त्याचे पुढे भविष्य काय? यावर कधी चर्चा होत नाही. दहिहंडी झाली की गणेशोत्सव. पुन्हा नाच, गाणी, डीजेच्या मोठ्या आवाजात सारे दंग झालेले दिसतात.

महापुरूषांच्या जयंती किंवा पुण्यतिथीला लहान मोठ्या शहरात गेल्या काही वर्षापासून मोठ्या मिरवणुका निघत आहेत. महापुरूषांचे फोटो लावलेले फ्लोट पुढे ठेवायचे व मागे डीजेच्या तालावर नाचायचे. हेच दृश्य सर्वत्र दिसते. एवढेच नव्हे तर हातात मद्याचे ग्लास आणि हातात सिगारेटी घेऊन बेभान झालेल्या तरूणांचे जथेही दिसू लागले आहेत. त्यांना आवरण्याचा कोणी प्रयत्न केला तर तुम्ही कोण सांगणार, आज आमचा दिवस आहे, आम्ही कसेही वागू .. अशी उत्तरे दिली जातात.

आपल्या नाचगाण्यामुळे व धिंगाण्यामुळे रस्त्यावरची वाहतूक दोनदोन चारचार तास ठप्प होते आहे याचे कुणालाच भान नसते. वाहतूक ठप्प झाल्याचे व्हिडिओ सोशल मिडियाव व्हायरल होतात पण कारवाई कुणावरच होत नाही. तक्रार आली तर कारवाई करू असा पोलिसांचा खाक्या असतो.

कोणी तक्रार केली तर त्याचेच नाव धिंगाणा घालणाऱ्या लोकांना समजते, यामागे कोण असते हे वेगळे सांगायला नको. रस्त्यावर वारंवार निघणाऱ्या मिरवणुकांना परवानगी का दिली जाते, कोण देतो, असे प्रश्न विचारचे नसतात. मिरवणुका नसतानाही मुंबई, पुणे अशा सर्वच शहरात रोज वाहतूक कोंडी असतेच मग आगमन असो वा विसर्जन, जयंती असो पुण्यतिथी या निमित्ताने निघणाऱ्या मिरवणुकांवर निदान वेळेचे तरी बंधन नको का ?

दहिहंडी, गणेशोत्सव, नवरात्रात गरबा, राजकीय पक्ष व त्याच्या बड्या नेत्यांच्या सभा अशा सर्वच ठिकाणी हजारो तरूण मुले उत्साहाने सहभागी झालेली दिसतात. सर्वच उत्सव, कार्यक्रम, सभा, मिरवणुकांमधे सहभागी व्हायला, नाचायला, घोषणा द्यायला या तरूणांना वेळ कसा मिळतो? त्यांचे शिक्षण काय? ही तरूणाई काय काम करते? कमाई काय? उत्पन्न काय ? शिक्षण, रोजगार आणि सर्वात महत्वाचे संस्कार या तरूणांवर आहेत का?

गेल्या काही वर्षापासून सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांच्या आगमनाच्या मिरवणुका सुरू झाल्या आहे. त्यामुळे मुंबईतील रस्ते पुन्हा वाहतूक कोंडीत सापडू लागले आहेत. आगमन व विसर्जन मिरवणुका, भव्य आरास, भव्य सजावट, मोठे मांडव, रोज कार्यकर्त्यांची चहा पानाची व्यवस्था , विद्युत रोषणाई, कलावंताची बिदागी, पाहुण्यांची सरबराई, रोजचा प्रसाद, आरती किती प्रचंड खर्च होत असतो. त्यातून समाजाला विशेषतः तरूणाईला काय मिळते?

लोकमान्य टिळकांनी सार्वजनिक गणेशोत्सव सुरू केला तो ब्रिटीशांच्या विरोधात जनजागृतीसाठी. लोकशिक्षण हा मुख्य हेतू होता. पण आज डीजे, नाच, गाणी, लाऊड स्पिकर्सवरील मोठाले आवाजाने गणेशोत्सव व्यापला आहे. गणेशोत्सवात सर्व रस्त्यावर राजकीय पक्षांच्या पुढाऱ्यांचे होर्डिंग आणि बॅनर्स सर्वत्र झळकत आहेत. गणेश भक्तांचे स्वागत अमराठी धनवंतांकडून व परप्रांतीय लोकांकडूनच मोठया प्रमाणावर फलकांवरून होत आहे.

गणशोत्सवाच्या काळात आरास , सजावट , फळे, फुले यांची विक्री प्रचंड होते, सर्वाधिक विक्रेते अमराठी आहेत असे लक्षात येते. वडापाव, बुर्जी पाव, आम्लेटपाव, चाईनिज, डोसा. पिज्झा, सँडविच आदी खाद्य पदार्थांच्या गाड्या रात्रभर पदपथावर व रस्त्यांवर गर्दीने वेढलेल्या असतात. हे विक्रेते सर्वाधिक अमराठी आहेत. उत्सवाच्या काळात हजारो मराठी तरूण मुलांचे जथे रस्त्यावर नाचत असतात आणि पाण्याच्या बाटल्या व वडा पाव विकून अमराठी पैसे कमावत असतात. अशा उत्सवातून आपण काही शिकणार आहोत की नाही?

डीजेचे फड इतके वाढले आहे की ध्वनिप्रदुषणाने सारी मुंबई व्यापली आहे. आजही शांतता प्रिय मुंबईकरांची संख्या लक्षावधी आहे. काहीही झाले तरी दुसऱ्या दिवशी सकाळी कामावर गेलेच पाहिजे, अशी संख्याही लक्षावधी आहे. घरात आजारी माणसे असतात. वयोवृध्द आई वडिल असतात. अभ्यास करून स्पर्धा परीक्षेला बसणारी हजारो मुले असतात. त्यांचा कोणी विचारच करणार नाही का?

डीजे, नाच, गाणी, धांगड धिंगा यावर नियंत्रण ठेवण्यासाठी कोणीही राजकीय नेता किंवा पक्ष प्रयत्न करणार नाही. कारण नाचणारे, गाणी लावणारे हे बेभान लोक ही त्यांची व्होट बँक आहे. आता तर चार महिन्यांवर महापालिका, नगर परिषदांच्या निवडणुका आहे आहेत.

कानठळ्या बसविणारा डीजे नको असे सांगायला कोणी पुढे येणार नाही. राज्यकर्त्यांना ध्वनिप्रदुषण आणि वाहतूक कोंडी रोखण्यात किती रस आहे हे दरवेळी अनुभवायला मिळतेच. मग प्रामाणिक, शांतताप्रिय समाजाने व करदात्या मुंबईकरांनी उत्सवाच्या काळात अपेक्षा तरी कोणाकडे करायची?

# श्री गणेश चतुर्थीस आचरण्यात येणाऱ्या व्रताविषयीचे शास्त्र



श्री गणेशचतुर्थी हा हिंदूंचा मोठा सण आहे. श्री गणेश चतुर्थीला, तसेच श्री गणेशोत्सवाच्या दिवसांत गणेशतत्त्व नेहमीच्या तुलनेत पृथ्वीवर १ सहस्र पटीने कार्यरत असते.

या काळात केलेल्या श्री गणेशाच्या उपासनेने गणेशतत्त्वाचा अधिक लाभ होतो. सुखकर्ता, विघ्नहर्ता आणि अष्टदिशांचा अधिपती असलेल्या श्री गणेशाची पूजा भावपूर्ण होऊन त्याचा कृपाशीर्वाद मिळावा, असाच सर्व गणेशभक्तांचा प्रयत्न असतो.

श्री गणेश चतुर्थीस आचरण्यात येणारे व्रत हे सिद्धीविनायक व्रत या नावाने ओळखले जाते. वास्तविक हे व्रत सर्व कुटुंबांत होणे क्रमप्राप्त आहे. सर्व भाऊ एकत्र रहात असतील म्हणजेच त्यांचा द्रव्यकोश (खजिना) आणि पाकनिष्पत्ती (चूल) एकत्र असेल, तर सर्वांत मिळून एक मूर्ती पुजली तरी चालते पण ज्या वेळी द्रव्यकोश आणि पाकनिष्पत्ती कोणत्याही कारणास्तव विभक्त असतील, तर त्यांनी आपापल्या घरी स्वतंत्र गणेशमूर्ती पुजावी. ज्या कुटुंबात एकच गणपति बसवण्याची दृढ परंपरा आहे, त्या कुटुंबात ज्या भावामध्ये देवाविषयी अधिक भाव आहे, त्याच्याच घरी गणपति बसवावा.

**नवीन मूर्तीचे प्रयोजन** : पूजेत गणपति असला, तरी गणपतीची नवीन मूर्ती आणावी. श्री गणेश चतुर्थीच्या वेळी गणेशलहरी पृथ्वीवर खूप जास्त प्रमाणात येतात. त्यांचे आवाहन नेहमीच्या पूजेतील मूर्तीत केल्यास तिच्यात खूप जास्त शक्ती येईल. जास्त शक्ती असलेल्या मूतीर्ची साग्रसंगीत पूजाअर्चा वर्षभर नीटपणे करणे कठीण जाते; कारण त्यासाठी कर्मकांडातील बंधने पाळावी लागतात. म्हणून गणेशलहरींचे आवाहन करण्यासाठी नवीन मूर्ती वापरतात आणि ती मूर्ती नंतर विसर्जित करतात.

**श्री गणेश चतुर्थीला पुजावयाची मूर्ती कशी असावी? :**

चिकणमाती किंवा शाडूची माती यांपासून मूर्ती बनवावी, असा शास्त्रविधी आहे. अन्य वस्तूंपासून (उदा. प्लास्टर ऑफ पॅरिस, कागदाचा लगदा) मूर्ती बनवणे, हे धर्मशास्त्रविरोधी, तसेच पर्यावरणाला घातक आहे. मूर्तीची उंची एक फूट ते दीड फूट असावी. मूर्ती शास्त्रानुसार बनवलेली, पाटावर बसलेली, डाव्या सोंडेची अन् नैसर्गिक रंगांनी रंगवलेली असावी. परंपरा किंवा आवड यांप्रमाणे गणेशमूर्ती आणण्यापेक्षा धर्मशास्त्रसंमत गणेशमूर्ती पुजावी.

**शास्त्रोक्त विधी आणि रूढी यांचा अवधी** : भाद्रपद शुद्ध चतुर्थीस मातीचा गणपति करतात. तो डाव्या हातावर ठेवून तेथेच त्याची सिद्धीविनायक या नावाने प्राणप्रतिष्ठा आणि पूजा करून लगेच विसर्जन करावे, असा शास्त्रविधी आहे; पण मनुष्य हा उत्सवप्रिय असल्याने एवढ्याने त्याचे समाधान होईना; म्हणून दीड, पाच, सात किंवा दहा दिवस श्री गणपति ठेवून त्याचा उत्सव करू लागला.

बरेच जण (ज्येष्ठा) गौरीबरोबर गणपतीचे विसर्जन करतात. एखाद्याच्या कुलाचारात गणपति पाच दिवस असेल आणि तो त्याला दीड किंवा सात दिवसांचा करावयाचा असला, तर तो तसे करू शकतो. यासाठी अधिकारी व्यक्तीस विचारण्याची जरूरी नाही. रूढीप्रमाणे पहिल्या, दुसऱ्या, तिसऱ्या, सहाव्या, सातव्या किंवा दहाव्या दिवशी श्री गणेशविसर्जन करावे.

**मूर्तीची आसनावर स्थापना** : पूजेपूर्वी ज्या पाटावर मूर्तीची स्थापना करायची असते, त्यावर तांदूळ (धान्य) ठेवून त्यावर मूर्ती ठेवतात. आपापल्या प्रथेप्रमाणे थोडे तांदूळ किंवा तांदुळाचा लहानसा ढीग करतात. मूर्तीत गणपतीचे आवाहन करून तिची पूजा केल्याने मूर्तीत शक्ती निर्माण होते. त्या शक्तीमुळे तांदूळ भारित होतात. सारख्या कंपनसंख्येच्या दोन तंबोऱ्याच्या दोन तारा असल्या, तर एकीतून नाद काढल्यास तसा नाद दुसऱ्या तारेतूनही येतो. त्याचप्रमाणे मूतीर्खालील तांदुळात शक्तीमुळे स्पंदने निर्माण झाली की, घरातील तांदुळाच्या साठ्यातही शक्तीची स्पंदने निर्माण होतात. अशा तऱ्हेने शक्तीने भारित झालेले तांदूळ वर्षभर प्रसाद म्हणून खाता येतात.

**पुजावयाची मूर्ती घरी कशी आणावी?**

श्री गणेश चतुर्थीसाठी पुजावयाची मूर्ती शक्यतो आदल्या दिवशीच आणून ठेवावी. श्री गणेशाची मूर्ती घरी आणण्यासाठी घरातील कर्त्या पुरुषाने इतरांसह जावे. मूर्ती हातात घेणाऱ्याने हिंदू वेशभूषा करावी, म्हणजे अंगरखा (सदरा)-धोतर किंवा अंगरखा-पायजमा परिधान करावा. त्याने डोक्यावर टोपीही घालावी.

मूर्ती आणतांना तिच्यावर रेशमी, सुती किंवा खादीचे स्वच्छ वस्त्र घालावे. मूर्ती घरी आणतांना मूतीर्चे मुख आणणाऱ्याकडे आणि पाठ समोरच्या दिशेस असावी. मूर्तीच्या समोरच्या भागातून सगुण तत्त्व, तर पाठच्या भागातून निर्गुण तत्त्व प्रक्षेपित होत असते.

मूर्ती हातात धरणारा हा पूजक असतो. मूर्तीचे मुख त्याच्याकडे केल्यामुळे त्याला सगुण तत्त्वाचा लाभ होतो, तर इतरांना निर्गुण तत्त्वाचा लाभ होतो. श्री गणेशाचा जयजयकार आणि भावपूर्ण नामजप करत मूर्ती घरी आणावी.

घराच्या उंबरठ्याबाहेर उभे रहावे. घरातील सुवासिनीने मूर्ती आणणाऱ्याच्या पायांवर दूध आणि नंतर पाणी घालावे. घरात प्रवेश करण्यापूर्वी मूर्तीचे मुख समोरील दिशेस करावे. यानंतर मूतीर्चे औक्षण करून ती घरात आणावी.

सजवलेल्या मखरात पाटावर किंवा चौरंगावर थोड्या अक्षता घालून त्यावर मूर्ती ठेवावी. सजावट पूर्ण व्हायची असल्यास मूर्ती अन्य सुरक्षित जागी ठेवून सजावट लवकरात लवकर पूर्ण करावी. मूर्तीला मखरात बसवल्यानंतर मूर्ती हलणार नाही किंवा मूर्तीस काही अपाय होणार नाही, याची काळजी घ्यावी. मूर्तीवर एखादे वस्त्र किंवा रूमाल घालून ती झाकून ठेवावी. उंदराची मूर्ती वेगळी असल्यास तीही सुरक्षित ठेवावी.

मूर्तीचे मुख पश्चिम दिशेला असेल अशा पद्धतीने ठेवावी, तसे शक्य नसल्यास पूजकाने पूजा करतांना स्वतःचे तोंड दक्षिण किंवा पश्चिम दिशेला येणार नाही, अशा पद्धतीने बसावे. मूर्तीचे तोंड पूर्व किंवा उत्तर दिशेला असेल, तर पूजकाने मूर्तीच्या डाव्या हाताला काटकोनात बसावे, म्हणजे पूजकाचे मुख उत्तरेला किंवा पूर्वेला होईल.

दक्षिण दिशेला मूर्तीचे तोंड असू नये. दक्षिणेकडे तोंड साधारणपणे उग्र देवतांचे असते, उदा. काली, हनुमान, नरसिंह इत्यादी. गणपतीची जी मूर्ती आपण आणतो, ती उग्र नसून प्रसन्न किंवा शांत असते; म्हणूनच शक्यतो तिला दक्षिणमुखी ठेवू नये.

**मध्यपूजाविधी** : गणपति घरी असेपर्यंत प्रतिदिन सकाळी आणि संध्याकाळी प्राणप्रतिष्ठा सोडून गणपतीची नेहमी पूजा करतो तशी पूजा करावी आणि शेवटी आरत्या आणि मंत्रपुष्प म्हणावे. गणेशमूर्तीच्या प्रतिष्ठापनेनंतर प्रतिदिन करावयाची पंचोपचार पूजा करावी.

**उत्तरपूजा** : गणपतीच्या विसर्जनापूर्वी ही पूजा करायची असते. विशिष्ट मंत्र म्हणून पुढे दिल्याप्रमाणे पूजा करावी – १. आचमन, २. संकल्प, ३. चंदनार्पण, ४. अक्षतार्पण, ५. पुष्पार्पण, ६. हरिद्रा (हळद)-कुंकूमार्पण, ७. दूर्वार्पण, ८. धूप-दीप दर्शन आणि ९. नैवेद्य. यानंतर आरती करून मंत्रपुष्पांजली समपार्वी. सर्वांनी गणपतीच्या हातावर अक्षता द्याव्या आणि मूर्ती उजव्या हाताने हालवावी.

**विसर्जन** : उत्तरपूजेनंतर मूर्तीचे जलाशयात विसर्जन करतात. विसर्जनाला जातांना गणपतीबरोबर दही, पोहे, नारळ, मोदक वगैरे शिदोरी द्यावी. जलाशयाजवळ पुन्हा आरती करावी आणि मूर्ती शिदोरीसह पाण्यात सोडून द्यावी.

श्री गणेश चतुर्थी या दिवशी चंद्रदर्शन करणे वर्ज्य असणे –

श्री गणेश चतुर्थीला कलंकित चतुर्थी असेही म्हणतात. या चतुर्थीला चंद्र पहाणे वर्जित आहे. चुकूनही चतुर्थीचा चंद्र दिसल्यास श्रीमद्भागवताच्या १० व्या स्कंधाच्या ५६-५७ व्या अध्यायात दिलेली स्यमंतक मण्याची चोरी ही कथा आदराने वाचली किंवा ऐकली पाहिजे.

भाद्रपद शुक्ल तृतीयेचा किंवा पंचमीचा चंद्र पहावा. यामुळे चतुर्थीर्ला चंद्रदर्शन झाल्यास त्याचा अधिक धोका रहात नाही. चुकून चंद्रदर्शन झाल्यास पुढील मंत्राने अभिमंत्रित केलेले पवित्र जल प्राशन करावे. या मंत्राचा २१, ५४ किंवा १०८ वेळा जप करावा.

सिंह : प्रसेनमवधीत सिंहो जाम्बवता हतः ।
सुकुमारक मा रोदीस्तव ह्येष स्यमन्तकः ।।
ब्रह्मवैवर्त पुराण, अध्याय 78

अर्थ : हे सुंदर सुकुमार! या मण्यासाठी सिंहाने प्रसेनला मारले आहे आणि जांबुवंताने त्या सिंहाचा संहार केला आहे; म्हणून तू रडू नकोस. आता या स्यमंतक मण्यावर तुझाच अधिकार आहे.

---

**संकलन : सौ. अंजली पाध्ये**
**सनातन संस्था, नागपूर**
**९९७५५३६९०६**
**संदर्भ : सनातन संस्थेचा ग्रंथ 'गणपति'**

# शालार्थ घोटाळा म्हणजे डिजिटल फसवणूक, देणगीचा मुद्दा नव्हे!



**अरूण सोपानराव कराळे**
**सेवानिवृत्त**
**पदवीधर शिक्षक**
**दत्तवाडी, नागपूर.**
**९०९६३२६२७२**

अलीकडच्या काही दिवसांत महाराष्ट्राच्या शैक्षणिक क्षेत्रात शालार्थ घोटाळा हा चर्चेचा प्रमुख विषय ठरला आहे. परंतु दुर्दैवाने ही चर्चा चुकीच्या दिशेला वळली आहे. सरकारी सॉफ्टवेअर प्रणालीतून बनावट शालार्थ आयडी तयार करून वेतन व निधीचा अपहार करणे ही खरी समस्या असूनसुद्धा, लोक या घोटाळ्याला शाळा व्यवस्थापनाच्या डोनेशन प्रथेशी जोडून पाहत आहेत.

ही तुलना चुकीची आणि धोकादायक आहे. कारण यामुळे खरी जबाबदारी झाकली जाते, आणि लोकांचे लक्ष मूळ फसवणुकीवरून हटवले जाते.

**घोटाळा विरुद्ध डोनेशन प्रथा : खरी तुलना**

**शालार्थ घोटाळा:**

सरकारी सॉफ्टवेअर प्रणालीत खोटे आयडी तयार करणे, बनावट कर्मचारी दाखवणे आणि त्यांच्या नावावर वेतन व निधी अपहार करणे. हा स्पष्ट डिजिटल फसवणुकीचा प्रकार आहे.

**डोनेशन प्रथा:**

गेली ५० वर्षे शाळांमध्ये नोकरीसाठी देणगी किंवा जबरदस्तीने पैसे घेण्याचा प्रश्न अस्तित्वात आहे. ही सामाजिक व आर्थिक समस्या आहे.

**तुलना समजण्यासाठी साधे उदाहरण:**

एखादा पोलीस अधिकारी खोटी एफआयआर दाखल करण्यासाठी लाच घेताना पकडला, तर त्या गुन्ह्यावर लक्ष केंद्रित करणे गरजेचे आहे. पण लोकांनी हे म्हणायला सुरुवात केली की, त्याने तर पोस्टिंगसाठीही लाच दिली असेल! हा वेगळा मुद्दा आहे. एफआयआर मधील लाच प्रकरणावर पांघरूण घालता येणार नाही. अशाच प्रकारे शालार्थ घोटाळा हा डिजिटल गैरव्यवहार आहे, तर डोनेशन प्रथा ही दीर्घकालीन सामाजिक समस्या आहे.

**शाळा व्यवस्थापन व शिक्षकांची वस्तुस्थिती**

लोकमतामध्ये शालार्थ घोटाळ्याचा संबंध शाळा व्यवस्थापन भ्रष्ट असल्याच्या धोरणाशी जोडला जातो. मात्र वास्तव वेगळे आहे:

अनेक शिक्षक दशकांपासून अनुदानित नसलेल्या शाळांमध्ये काम करत आहेत, कायम नोकरीच्या आशेने.

गणित, विज्ञान आणि आरक्षित प्रवगार्तील उमेदवार अनुदानित शाळांत तातडीने आवश्यक आहेत.

व्यवस्थापनांवर राजकीय नेते व शिक्षणाधिकारी दबाव आणतात की त्यांचे उमेदवार घ्यावेत. बदल्यात ते रिक्त पदे मंजूर करण्याचे आश्वासन देतात.

यामुळे व्यवस्थापनांची प्रतिमा एकसारखी भ्रष्ट म्हणून रंगवणे चुकीचे आहे.

**अनुदानित शिक्षणाचे अर्थकारण**

डोनेशन प्रथा समजून घेण्यासाठी शाळा चालवण्याच्या अर्थकारणाकडे पाहावे लागेल: आज शाळा चालवणे हे आर्थिकदृष्ट्या फायदेशीर नाही.

अनेक व्यवस्थापनांना त्यांच्या शाळांच्या इमारती गोदामे किंवा ऑफिसेसला भाड्याने देणे अधिक फायदेशीर ठरते.

तरीदेखील अनेक व्यवस्थापनं शाळा चालवण्याला सेवा-केंद्रित जबाबदारी म्हणून निभावत आहेत.

होय, नोकरीसाठी डोनेशन मागितले जाते, हे नाकारता येत नाही. पण ही प्रथा मर्यादित पदे आणि वाढती नोकरीची मागणी यामुळे जन्माला आली. सरकारने लोकसंख्येनुसार पुरेशी नोकरीची पदे निर्माण केली नाहीत, हेच खरे शासकीय अपयश आहे.

**खरा मुद्दा कुठे आहे?**

शालार्थ घोटाळ्याच्या चर्चेत डोनेशनचा मुद्दा ओढून आणण्याचा एकच उद्देश आहे, बनावट आयडी तयार करून पगार लुटणारे गुन्हेगार झाकले जावेत.

त्यामुळे निरपराध शिक्षक, पालक व व्यवस्थापनांना चुकीच्या पद्धतीने दोष दिला जातो.

जर चर्चा अशीच गोंधळलेली राहिली, तर शालार्थ घोटाळ्याचे खरे दोषी हातातून निसटतील.

**नागरिकांसाठी संदेश**

शालार्थ घोटाळा हा फक्त डोनेशनचा प्रश्न नाही, तर डिजिटल फसवणूक आणि सरकारी प्रणालीचा गैरवापर आहे.

खरे दोषी आहेत ते बनावट कर्मचारी तयार करून वेतन लुटणारे.

समाजाने लक्ष केंद्रीत ठेवले पाहिजे की ही फसवणूक उघडकीस आणली जावी.

अन्यथा खरे गुन्हेगार सुटतील आणि पुन्हा शिक्षक, व्यवस्थापन व पालक यांनाच दोषी ठरवले जाईल.

**: निष्कर्ष :**

शालार्थ घोटाळा हा शैक्षणिक क्षेत्रातील डिजिटल लूट आहे. तो डोनेशनसारखा सामाजिक प्रश्न नाही. खरी जबाबदारी लपवण्याचा खेळ थांबवून नागरिकांनी लक्ष खऱ्या गुन्हेगारांवर केंद्रित करणे हीच काळाची गरज आहे.

## वाचक लिहितात

### राज्यघटनेतील १३० सुधारणा

संसदेच्या पावसाळी अधिवेशनामध्ये १३० घटनादुरुस्ती हे अत्यंत महत्त्वाचे विधेयक मांडण्यात आले. पंतप्रधान, मुख्यमंत्री तसेच राज्य आणि केंद्रशासित प्रदेश यामधील मंत्री या राज्यघटनात्मक महत्त्वांच्या पदांवरील व्यक्ती गंभीर गुन्ह्यांमध्ये आढळल्यास त्यांना पदावरून थेट बाजूला हटवण्याचा कायदेशीर मार्ग या कायद्याद्वारे प्राप्त होणार आहे.

यामध्ये पाच वर्ष किंवा त्याहून अधिक कालावधीच्या शिक्षेचे प्रावधान असलेल्या गंभीर गुन्हा नोंद झाल्यास अन ३० दिवसाच्या आत जामीन न मिळाल्यास एकतिसव्या दिवशी त्यांना पदावरून हटवता येऊ शकेल. भविष्यात त्यांचे निर्दोषत्व सिद्ध झाल्यास त्यांना पुन्हा पदभार स्वीकारता येऊ शकेल.

आरोप सिद्ध झालेले नसताना गंभीर गुन्हाच्या आरोपावरून नैतिकदृष्ट्या राज्यघटनात्मक पदावरील व्यक्तीला हटवण्याचे प्रावधान असलेला हा देशातील पहिलाच कायदा ठरेल. लोकपाल कायद्यानंतर मंत्री मुख्यमंत्री आणि प्रधानमंत्री यांना कायद्याच्या चौकटीत आणणारा हा आणखीन एक ऐतिहासिक कायदा ठेवू शकेल परंतु या विधेयकाला अनेक विरोधकांनी विरोध केला आहे.

भ्रष्टाचार करून आणि गुन्हेगारीला थारा देऊन कोट्यवधी जनतेचे नेतृत्व करण्याचा नैतिक अधिकार एखाद्याला राहतो का याचा विचार सर्वपक्षीयांनी विरोध करण्यापूर्वी करणे आवश्यक आहे.

एखादा कायदा संसदेत संमत करताना किंवा त्याला विरोध करताना सत्ताधारी आणि विरोधक यांचा विचार राष्ट्रहिताचाच असायला हवा. वादविवाद किंवा चर्चा यातून चांगल्या कायद्याची निर्मिती ही सकस लोकशाहीचे लक्षण आहे. आमदार आणि खासदारांना निवडून देताना लाखो नागरिक मतदान करतात. मंत्रिपदाची शपथ घेतल्यावर अथवा सरकार स्थापन झाल्यावर ते कोणत्या एका राजकीय पक्षापुरते मर्यादित न राहता समाज आणि राष्ट्रहितासाठी बांधील असावे हा खरा लोकशाहीचा गाभा आहे.

आपल्या भारतीय संस्कृती राजा कसा असावा त्याची काही उदाहरणे आहेत ती म्हणजे छत्रपती शिवाजी महाराज, प्रभू श्रीराम, शिबिराजा यांनी राजा म्हणून किती विचार करावा लागतो, किती कर्तव्य कठोर व्हावे लागते आणि प्रजे सर्व प्राणीमात्रांचे पालक व्हावे लागते हे दाखवतात. आज देशात लोकशाही आहे त्यामुळे लोकशाहीतील राज्यघटनात्मक महत्त्वाच्या पदांवरील व्यक्ती याचे प्रथम कर्तव्य राष्ट्रहित व धर्महित जपणे असे असायला पाहिजे मग ती व्यक्ती सत्ताधारी पक्षात असो वा विरोधी पक्षात सर्वांना हा नियम लागू आहे.

■ **लीना मकरंद गाडगीळ, पनवेल.**

### ऋषीपंचमी व्रत : ऋषींच्या ऋणाची आठवण!

ईश्वरप्राप्तीसाठी जे दीर्घकालीन साधना करतात त्यांना ह्यऋषीह्व म्हणतात. ऋषी हा शब्द ऐकताच आपले हात आपोआप जोडले जातात आणि मस्तक आदराने झुकते. विविध योगमार्गांनी साधना करून ऋषींनी धर्माचरण आणि साधना यांचा समाजात प्रसार केला आणि समाजाला सुसंस्कृत केले. वेद, उपनिषद, स्मृती, पुराणे यांसारखे प्राचीन धर्मग्रंथ त्यांनी रचले.

हिंदू धर्मानुसार मनुष्यजन्मातील चार ऋणांपैकी ऋषिऋण हे एक महत्त्वाचे ऋण मानले जाते. हे ऋण फेडण्यासाठी आणि ऋषींबद्दल कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी ऋषीपंचमी व्रत केले जाते. भाद्रपद मासातील शुक्ल पक्षातील पंचमीला हे व्रत पाळले जाते. मासिक पाळी, अशौच आणि स्पर्शास्पशार्मुळे लागलेले दोष नष्ट करण्यासाठी स्त्रिया हे व्रत करतात. या दिवशी सकाळी स्नान करून अरुंधतीसह सप्तर्षींची (कश्यप, अत्रि, भारद्वाज, विश्वामित्र, गौतम, जमदग्नि आणि वसिष्ठ) पूजा केली जाते. पाटावर तांदुळाच्या आठ पुंज्या मांडून त्यांवर आठ सुपाऱ्या ठेवतात. त्यावर कश्यपादी सप्तर्षी आणि अरुंधती यांचे आवाहन करून षोडशोपचार पूजा केली जाते. या दिवशी कंदमुळांचा आहार घ्यावा आणि बैलांच्या श्रमाचे काहीही खाऊ नये, असे शास्त्र सांगते. दुसऱ्या दिवशी सप्तर्षी आणि अरुंधती यांचे विसर्जन केले जाते. ऋषींप्रती कृतज्ञता व्यक्त करून, त्यांनी दिलेल्या अध्यात्म, विज्ञान आणि संस्कारांचे स्मरण करून या व्रताची सांगता केली जाते.

■ **रेणुका हरदास**
**नागपूर.**

## अशोकायन



**प्रा. अशोक सारडा**
**मेहकर**
**(९४२१३९४३३९)**

**प्रथम तुम्हा वंदीतो..!**

**कार्यारंभी गणरायाची करता**
**मनोभावे आराधना**
**विघ्ने येती पण जाती लयास**
**पूर्ण होती मनोकामना ..!**

**शक्तिदायनी जगदंबा**
**विघ्नहर्ता श्री गणेश**
**पाठीशी असता**
**चिंता करू नको नरेश !**

**श्रद्धा असावी पक्की**
**संकटी होऊ नये डळमळीत**
**अग्नीपरीक्षे विना भौ**
**तो देईल कसे झोळीत ..!**

# दात काढल्यानंतर काय काळजी घ्यावी?



कधी कधी काही थंड खाल्ल्यामुळे तुमच्या दातांमध्ये झणझणाट होते. दात काढणे ही एक सामान्य दंत प्रक्रिया आहे ज्यामध्ये तोंडातून दात त्याच्या मुळासह काढून टाकला जातो. हे अनेक कारणांसाठी केले जाते, जसे की खोलवर किडणे, गंभीर संसर्ग, तुटलेला किंवा कमकुवत दात किंवा कधीकधी ऑर्थोडोंटिक उपचारांसाठी.

दात काढण्याचे दोन मुख्य प्रकार आहेतः साधे काढणे, जिथे दात सहज दिसतो आणि सामान्य स्थितीत असतो आणि शस्त्रक्रिया काढणे, जिथे दात मुळाशी असतो किंवा तोंडात बसलेला असतो आणि त्यासाठी किरकोळ शस्त्रक्रिया आवश्यक असतात. ही प्रक्रिया सुरक्षित आहे आणि आधुनिक दंत तंत्रांमुळे, वेदना आणि संसगार्चा धोका खूप कमी आहे.

दात काढण्याचे अनेक फायदे आहेत. सर्वप्रथम, ते तोंडाचा संसर्ग आणि वेदना कमी करते. कुजलेला किंवा कमकुवत दात आजूबाजूच्या दातांवर देखील परिणाम करू शकतो, जो संपूर्ण तोंडाचे आरोग्य सुधारण्यासाठी काढता येतो.

याशिवाय, तोंडाच्या शस्त्रक्रिया किंवा ऑर्थोडोंटिक उपचारांसाठी जागा मोकळी करण्यासाठी दात देखील काढले जातात. तथापि, त्याचे काही धोके देखील आहेत. यामध्ये संसर्ग, दीर्घकाळ रक्तस्त्राव, सूज, वेदना आणि कधीकधी नसा किंवा मुळांना दुखापत होऊ शकते.

म्हणून, डॉक्टरांचा योग्य सल्ला आणि योग्य काळजी घेणे खूप महत्वाचे आहे. आरोग्य तज्ञांच्या मते, दात काढल्यानंतर योग्य काळजी घेतल्यास लवकर बरे होण्यास मदत होते. दात काढल्यानंतर काही काळ हलका रक्तस्त्राव होणे सामान्य आहे, म्हणून त्यावर कापूस लावा. पहिले २४ तास गरम पाणी किंवा गुळण्या टाळा.

गरम किंवा मसालेदार अन्नाऐवजी मऊ आणि हलके अन्न खा. धूम्रपान आणि मद्यपान टाळा, कारण ते जखमेवर परिणाम करू शकतात. वेदना किंवा सूज आल्यास, डॉक्टरांनी सांगितलेले वेदनाशामक औषध वापरा. ब्रश किंवा फूड फ्लॉस थेट जखमेवर लावू नका. हळूहळू सामान्य टूथब्रशिंग आणि माउथवॉशिंग सुरू करा. या काळात डॉक्टरांच्या सूचनांचे पालन करणे सर्वात महत्वाचे आहे.

**या गोष्टी लक्षात ठेवा.**

पुरेसे पाणी प्या.
आंबट किंवा मसालेदार पदार्थ टाळा.
जर जखमेतून जास्त रक्तस्त्राव होत असेल तर ताबडतोब डॉक्टरांशी संपर्क साधा.
डॉक्टरांनी सांगितलेल्या वेळेचे पालन करा.
जर तुम्हाला काही असामान्य लक्षणे किंवा तीव्र वेदना जाणवत असतील तर ताबडतोब डॉक्टरांचा सल्ला घ्या.

महासागर



# गडचिरोली जिल्हा वर्धापन दिन विशेष

# जिल्ह्याला पर्यटन क्षेत्रात वाव मात्र, ४३ वर्ष होऊनही विकासात मागे !

२६ ऑगष्ट १९८२ रोजी चंद्रपूर जिल्ह्याचे विभाजन होऊन गडचिरोली जिल्ह्याची निर्मिती झाली. स्वंतत्र जिल्हा निर्माण होऊन ४३ वर्ष पूर्ण झाले असून सुध्दा जिल्हा पर्यटन विकास आराखड्याअभावी जिल्ह्यात पर्यटन क्षेत्रात वाव असताना सुध्दा जिल्ह्याकडे पर्यटक आकर्षित होऊ शकले नाही, ही वास्तविकता आहे.

जिल्ह्यातील बाराही तालुक्यातील पर्यटन स्थळावर पर्यटकांना आवश्यक असणाऱ्या सर्व सोईसुविधा उपलब्ध नाही याकडे लोकप्रतिनिधी व जिल्हा प्रशासनाच्या दुर्लक्षिततेमुळे पर्यटनाचा विकास होऊ शकला नाही त्यामुळे देश विदेशातील पर्यटक या स्थळाकडे पाट फिरवली आहे.

सरकारने शासनाच्या पर्यटन धोरण असताना जिल्ह्यातील बाराही तालुक्यातील पर्यटन स्थळावर जिल्हा प्रशासनाने पर्यटन विकास आराखड्यात पायाभूत सुविधा, इको टुरिझम जंगल सफारीसारखे विविध उपक्रम, जिल्ह्याची माहिती पुस्तिका टुरिस्ट गाईड, पर्यटकांना निवासाची चांगली सुविधा, दळणवळणाच्या सोयी सुविधा, इत्यादी पायाभूत सुविधा समाविष्ट करण्याची गरज होती. मात्र तसे नियोजन केल्याचे दिसत नाही.

त्यामुळे जिल्हा पर्यटन विकास होऊ शकले नाही हे वास्तव आहे. त्याकडे जिल्ह्यातील लोकप्रतिनिधी पाठ फिरवली हेही वास्तव आहे त्यासाठी आतातरी जिल्ह्यातील लोकप्रतनिधीं, व जिल्हा प्रशासना कडून पर्यटन जिल्हा करण्यासाठी प्रयत्न करावे अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

**चामोर्शी तालुका :-** तालुका मुख्यालयापासून अगदी जवळ असलेल्या मार्कंडा देव या स्थळी वैनगंगा नदीच्या तीरावर वसलेले मार्कंडेश्वर शिव मंदिर विदर्भाची काशी म्हणून ओळखल्या जात असून, या ठिकाणी उत्तर वहिनी असल्याने या स्थळाला धार्मिक महत्व आहे. महाशिवरात्रीला मोठी यात्रा भरते. या ठिकाणी राज्यातून व बाहेर राज्यातून भाविक मोठ्या संख्येने येतात मात्र येथेही अद्याप आवश्यक सोयी सुविधा उपलब्ध नाहीत.

**चपराळा अभयारण्य:-** याच तालुक्यात आलापल्ली ते आष्टी मार्गावर चौडमपल्ली पासून ०६ कि.मी. अंतरावर वैनगंगा व वर्धा नदीच्या संगम तीरावर सुप्रसिध्द चपराळा देवस्थान असून हे देवस्थान चपराळा अभयारण्यांतर्गत येते. येथेही महाशिवरात्रीला मोठी यात्रा भरते.

**आरमोरी तालुका:-** तालुक्यातील वैरागड येथे प्रसिद्ध प्राचीन किल्ला असून नांगवंशिय माना राजाच्या राजवटीचा तो ऐक अवशेष आहे वैरागड गावाच्या पूर्वेस १० एकर जागेत हा किल्ला आहे.

**कोरची तालुका:-** तालुक्यात सावरगाव - कोटगुलच्या मध्ये निहाकल या छोट्याशा गावाजवळ उंच टेकडीवरील पठारावर टीपागड किल्ला असून हा किल्ला तत्कालीन राजा पूरमशहा यांनी निर्माण केला आहे.

**सिरोंचा तालुका (सोमनुर त्रिवेणी संगम) :**
सिरोंच्या पासून ४० कि. मी. व असरल्लीपासून पूर्वेस १० कि. मी अंतरावर महाराष्ट्र, आंध्रप्रदेश सिमेवर गोदावरी इंद्रावती नदीच्या काठावर सोमनुरला लागून देखणा व निसर्गरम्य त्रिवेणी संगम असून, जिथे संगम होता तिथे सदावती नदी गुप्त रुपात असल्याने या संगमाला त्रिवेणी संगम म्हणतात.

**कालेश्वर देवालय :-** सिरोंचा पासून १० कि. मी. अंतरावर असलेल्या आध्रप्रदेशातील आदिलाबाद जिल्ह्यात गोदावरी नदीच्या तीरावर वसलेले कालेश्वर देवालय आहे

**अहेरी तालुका**
**(वनवैभव - ग्लोरी ऑफ फॉरेस्ट) :**
तालुक्यातील आलापल्ली येथून १६ कि.मी. अंतरावर राम लक्मन नावाच्या सागवानाची जोडी होती ती आजही आहे. हा ३५ मिटर उंचीचा सागवान सर्वांच्या कुतूहलाचा, आकर्षणाचा विषय ठरला आहे.

**नैसर्गिक खुले रंगमंच बोगम दान परपू :**
अहेरी तालुक्यात आणखी एक महत्वाचे स्थळ म्हणजे महाभारतकालीन नैसर्गिक खुले रंगमंच बोगम दान परपु होय. पांडवाचे वास्तव लक्खामेंडा येथे असताना ते आपल्या मनोरंजनासाठी या खुल्या रंगमंचावर येत असत.

**भामरागड तालुका (बिनागुंडा) :**
अतीदुर्गम आणि नैसर्गिक सृष्टी सौंदयाने नटलेल्या भामरागड तालुक्यात अगदी पूर्वेला सुमारे ४० कि.मी. अंतरावर बिनागुंडा प्रेशकणीय स्थळ असून येथील नाले बाराही महिने वाहतात. त्यामुळे डोंगर पठारावर नेहमी हिरवेगार हष्य असते. तेथे ऐक धबधबा असून त्याला इंद्रसकाळ असे म्हणतात.

**हेमलकसा प्राणी संग्रालय :** आदिवासीं बहुल भामरागड तालुक्यात बाबुळ, पर्णकोटा, बंडीया, व गोंडशी या चार नध्याचा विस्तीर्ण संगमामुळे या परिसरात हिरव्यागार वृक्षवेलींनी घनदाट जंगल परिसर विलोभनीय असून, याच ठिकाणी मानव कल्याणासाठी काम करणारे बाबा आमटे यांचा वसा त्यांचे सुपुत्र डॉ. प्रकाश आमटे यांनी तेथे नंदनवन फुलवून आदिवासींची सेवा करत आहेत.

**एटापल्ली तालुका (सूरजागड किल्ला) :**
अतिदुर्गम अशा एटापल्ली तालुक्यात सुरजागड प्रसिध्द किल्ला आहे सूरजागड टेकड्या या सातपुड्याच्या रांगा असून त्या समुद्र सपाटीपासून २ हजार कि. मी अंतरावर आहेत छत्तीसगड राज्यातील याच टेकड्यातून पर्लकोटा, पामुलगौतम, इंद्रावती, या नद्या उंगम पावतात. ऐटापल्ली पासून १६ कि. मी अंतरावर सूरजगड हे लोहयुक्त पहाड असून, याचं पहाडावर ऐतिहासिक किल्ला आहे.

**धानोरा तालुका (भोवरागड) :**
तालुक्यापासून ४ कि.मी. अंतरावर असलेल्या भोवरागड स्थळावर दरवर्षी रंगपंचमीच्या पहिल्या आठवड्यात यात्रा भरते याच ठिकाणी महादेवाची शिवलिंग आहे हे प्रेक्षणीय स्थळ आहे

**कुरखेडा तालुका, (खोब्रामेंढा) :**
कुरखेडा ते धानोरा मार्गावर मालेवांडा गावापासून ईशान्येला १० ते १५ की.मी. अंतरावर खोब्रागड देवस्थान व जागृत हनुमान देवस्थान असून मंदिराच्या पूर्वेस डोंगर त्या डोंगरावर पठार असून त्या पठारावर अर्धवट किल्ला आहे.

**अरततोंडी शिवलिंग मंदिर:**
कुरखेडा तालुक्यात गुरनोली या पोच मागार्पासून २ की.मी. अंतरावर अरततोंडी हे देवस्थान असून तेथे महादेवाचे शिवलिंग आहे येथे महाशिवरात्रीला मोठी यात्रा भरते.

**देसाईगंज तालुका (आमगाव बुट्टी) :**
देसाईगंज लाखांदूर या राज्य मार्गावर २किमी अंतरावर आमगाव बुट्टी हे ऐक अविस्मरणीय पर्यटन स्थळ आहे. गावाच्या मध्यभागी तलाव आहे.

**गडचिरोली तालुका (सेमाना देवस्थान) :**
जिल्हा मुख्यालयापासून चामोर्शी मार्गावर अवघ्या ४ कि.मी. अंतरावर प्रसिद्ध सेमाणा देवस्थान आहे. या ठिकाणी हनुमानाचे भव्य मंदिर असून राम सीता लक्ष्मण यांचेही मंदिर आहे या ठिकाणी दर शनिवारी, सोमवारला या परिसरातील भाविक मोठ्या संख्येने गर्दी करतात.

**मुलचेरा तालुका**
**(राजा रामजी गेडाम ऐतिहासिक स्थळ) :-**
तालुका मुख्यालयापासून १२ कि.मी. अंतरावर असलेल्या पहाडावर इंग्रजकाळीन रामजी गेडाम नामक राजा राहत होता. या ठिकाणी मोठी गुफा असून सभोवताल खाडी आहे तेथे जाण्यासाठी ऐकच रस्ता असून पहाडावर पूर्वी बंदूक गाडलेल्या अवस्थेत होती ती बंदूक आता नष्ट झाली असल्याचे जाणकारांकडून समजले. पुरातन काळात इंग्रजांकडून आक्रमण झाले त्यावेळी राजा रामजी गेडाम पहाडावर असलेल्या गुप्त गुहेतून पलायन केले असा इतिहास आहे.

जिल्ह्यातील बाराही तालुक्यात ऐतिहासिक व घनदाट जंगलसृष्टी सौंदर्य निसगार्ने भरभरून दिले असल्याने या नैसर्गिक सौंदर्यामुळे या जिल्ह्याची ओळख आहे मात्र गेल्या ४२ वर्षात पर्यटन जिल्हा होऊ शकला नाही. त्या बारा तालुक्यात आवश्यक सोयी सुविधा उपलब्ध केले नाही त्यासाठी जिल्ह्यातील बाराही तालुक्यातील स्थळाचा विकास होणे गरजेचे आहे. तरच जिल्ह्याची ओळख निर्माण होईल.





# गडचिरोली जिल्ह्याची निर्मिती



गडचिरोली जिल्ह्याची निर्मिती २६ आगस्ट १९८२ रोजी चंद्रपूर जिल्ह्याचे विभाजन करून झाली. संपूर्ण गडचिरोली जिल्हा हा पूर्वी चंद्रपूर जिल्ह्यामध्ये समाविष्ट होता व मुख्यतः गडचिरोली, सिरोंचा ही ठिकाणे चंद्रपूर जिल्ह्यामध्ये तहसील म्हणून कार्यरत होती. गडचिरोली जिल्ह्याचे एकुण क्षेत्रफळ १४४१२ चौ. कि. मी. आहे.

चंद्रपूर व ब्रम्हपुरी मधील जमिनदारी व मालमत्तेचे हस्तांतरण, करून गडचिरोली तहसील म्हणून १७०५ पासून अस्तित्वात होती. ब्रम्हपुरी ऐवजी गडचिरोली जिल्ह्याची निर्मिती २६ आगस्ट १९८२ रोजी चंद्रपूर जिल्ह्याचे विभाजन करून करण्यात आली आहे.

गडचिरोली जिल्हा हा महाराष्ट्र, राज्याच्या विदर्भ या प्रदेशात मोडतो. फार प्राचीन काळी ह्या प्रदेशावर राष्ट्रकुट यांचे राज्य होते. त्यानंतर चालुक्य, देवगीरीचे यादव यांचे साम्राज्य होते. यानंतर गडचिरोलीच्या गोंड राजांनी राज्य केले. तेराव्या शतकात, खन्डक्या बल्लाळशाह यांनी चंद्रपूरची स्थापना केली. त्यांनी आपली राजधानी सिरपूर येथून चंद्रपूर येथे हलविली.

याचकाळात चंद्रपूर प्रदेश हा मराठ्याच्या सत्तेखाली आला. १८५३ मध्ये, बेरार हा चंद्रपूर (पूवीर्चे चांदा) प्रदेशाचा भाग ब्रिटीश ईस्ट इंडिया कंपनीच्या ताब्यात आला. १८५४ मध्ये चंद्रपूर हा बेरार या प्रदेशाचा स्वतंत्र जिल्हा म्हणून अस्तित्वात आला. ब्रिटीशांनी १९०५ मध्ये चंद्रपूर व ब्रम्हपुरीची जमिनदारी व मालमत्ता हस्तांतरण करून गडचिरोली तहसीलची निर्मिती केली.

राज्याची पुनर्ररचना होण्यापुर्वी हा भाग १९५६ पर्यंत केंद्रीय अधिपत्याखाली होता. त्यानंतर राज्यपुनर्रचनेनुसार चंद्रपूर बॉम्बे स्टेट मध्ये समाविष्ट करण्यात आले. १९६० मध्ये केंद्र शासनाने महाराष्ट्र राज्याची स्थापना करून त्यामध्ये चंद्रपूर हा जिल्हा म्हणून समाविष्ट केला. १९८२ मध्ये चंद्रपूर जिल्ह्याचे विभाजन करून ब्रम्हपुरी ऐवजी स्वतंत्र गडचिरोली जिल्हा अस्तित्वात आला.

गडचिरोली जिल्हा हा महाराष्ट्र राज्याच्या उत्तर-पूर्व दिशेला वसलेला असून तेलंगणा व छत्तीसगड राज्याच्या सीमा लागून आहेत. गडचिरोली जिल्हा हा पूर्णपणे नक्षल प्रभावित जिल्हा म्हणून ओळखला जातो. गडचिरोली जिल्हा जवळपास ७६ टक्के जंगलाने व्यापलेला असल्याने घनदाट जंगलात नक्षल समर्थित लोक आश्रय घेतात.

गडचिरोली जिल्हा हा मुख्यत्वे महाराष्ट्र राज्यात आदिवासी, मागासलेला व घनदाट जंगलाने व्याप्त जिल्हा म्हणून ओळखला जातो. हा जिल्हा अतिदुर्गम, डोंगर दऱ्याने व्याप्त व अविकसित असून जास्तीत जास्त क्षेत्र जंगलाने वेढलेला आहे.

हा जिल्हा बांबुचे झाड व तेंदूच्या पानाकरीता प्रसिध्द आहे. जिल्ह्यातील लोकांचा मुख्य व्यवसाय शेती आहे. धान हे जिल्ह्याचे मुख्य पिक आहे. याव्यतिरिक्त तूर, गहू, ज्वारी, सोयाबीन, जवस इत्यादी कृषी उत्पादने घेतली जातात. जिल्ह्यात चामोर्शी तालुक्यामध्ये आष्टी येथे पेपर मिलचा कारखाना होता. कालांतराने तो बंद पडला. सुरजागड येथे लोहखनीज उत्खनन केले जाते.

इतर कोणतेही मोठे उद्योगधंदे नाहीत. यामुळे हा जिल्हा आर्थिकदृष्ट्या मागासलेला आहे. जिल्ह्यात धानाचे उत्पादन जास्त होत असल्याने धानगिरणीची संख्या जास्त आहे. जिल्ह्यात कोसाचे उत्पादन होत असून कोसा उत्पादन केंद्र आरमोरी येथे आहे. जिल्ह्यात फक्त १८. ५ कि. मी. लांबीचा रेल्वे मार्ग असून देसाईगंज येथे रेल्वेची सुविधा आहे.

गडचिरोली जिल्ह्यामध्ये मुख्यतः गोंडी, माडिया, मराठी, हिंदी, तेलगु, बंगाली, छत्तीसगडी इत्यादी भाषा बोलल्या जातात. गडचिरोली जिल्ह्यामध्ये शासनाने प्रशासकीयदृष्ट्या गडचिरोली, देसाईगंज, अहेरी, चामोर्शी, एटापल्ली, कुरखेडा असे सहा उपविभाग निर्माण केले असुन प्रत्येक उपविभागात दोन तालुके सामाविष्ट करण्यात आले आहेत.

जिल्ह्यात एकूण १२ तालुके आहेत. जिल्ह्यात ४५७ ग्रामपंचायती असून १६८८ राजस्व गावे अस्तित्वात आहेत. जिल्ह्यामध्ये तीन विधानसभा व चंद्रपूर जिल्ह्याचा काही भाग मिळून एक लोकसभा क्षेत्र आहे. १२ पंचायत समीती आहेत. जिल्ह्यात ९ नगर पंचायती असून गडचिरोली, देसाईगंज (वडसा) व आरमोरी या शहरात नगरपालिका आहेत.

गोदावरी नदी पश्चिमेकडून पूर्वेकडे वाहत असून तिचे पात्र जिल्ह्याच्या सीमेला लागून असून दक्षिण भागाला जिल्हा वसलेला आहे. गोदावरी नदीच्या उपनद्या जसे प्राणहिता (वैनगंगा व वर्धा या उपनद्या मिळून) व इंद्रावती या मुख्य नद्या जिल्ह्याच्या सीमाभागात वाहतात.

जिल्ह्याच्या भामरागड, टिपागड, पलसगड व सुरजागड भागात उंच टेकड्या आहेत. विदर्भाची काशी म्हणुन ओळखल्या जाणारे मार्कंडा देव येथील मंदीर चामोर्शी तालुक्यात वैनगंगेच्या काठावर वसले आहे. जिल्ह्यास वैभवशाली परंपरा लाभली आहे. जिल्ह्यातील वैभवशाली परंपरेचे जतन होणे आवश्यक आहे.

# चपराळा वन्यजीव अभयारण्य

महाराष्ट्राच्या गडचिरोली जिल्ह्यात वसलेले चपराळा वन्यजीव अभयारण्य हे निसर्ग आणि वन्यजीव प्रेमींसाठी स्वर्ग आहे. १९८६ मध्ये स्थापन झालेल्या या अभयारण्याचे क्षेत्रफळ सुमारे १३४.७८ चौरस किलोमीटर आहे. येथे दुर्मिळ आणि संकटग्रस्त प्रजातींचे संरक्षण केले जाते, त्यामुळे हे एक महत्त्वाचे जैवविविधता केंद्र मानले जाते.

घनदाट जंगल, समृद्ध वनस्पती आणि अद्वितीय वन्यजीवांचा अधिवास असलेले हे अभयारण्य पर्यटकांना निसर्गाच्या सान्निध्यात रमण्याची अनोखी संधी देते. येथे शांत आणि निसर्गरम्य वातावरण असल्यामुळे, निसर्गसंपत्तीचा प्रत्यक्ष अनुभव घेण्यासाठी हे ठिकाण अत्यंत आकर्षक आणि अनिवार्य आहे!

चपराळा वन्यजीव अभयारण्याचा भूभाग प्रामुख्याने दक्षिणी उष्णकटिबंधीय कोरड्या पानगळी जंगलांनी व्यापलेला आहे. या जंगलांमध्ये गवताळ क्षेत्रे मिश्रित असल्यामुळे येथे विविध प्रकारच्या वन्यजीवांसाठी आदर्श अधिवास निर्माण झाला आहे. अभयारण्याच्या पश्चिम सीमेवर प्रवाहित होणारी प्राणहिता नदी ही येथील प्राण्यांसाठी जीवनरेखा आहे. या नदीमुळे परिसराच्या पर्यावरणीय समृद्धीला चालना मिळते आणि जैवविविधता अधिक वाढते. मुर्गिकुंटा, रायकोंटा आणि कोमातकुंटा यांसारख्या जलाशयांचे अस्तित्वही आढळते.

कोरड्या जंगलांचा विस्तार आणि मुबलक पाण्याच्या स्त्रोतांचा संगम या ठिकाणी विविध वनस्पती आणि प्राण्यांसाठी पोषक वातावरण निर्माण करतो. त्यामुळे, चपराळा अभयारण्य हे जैवविविधतेने समृद्ध असलेले एक महत्त्वाचे निसर्गसंपन्न ठिकाण आहे. जिथे वन्यजीवांना नैसर्गिकरित्या भरभराटीची संधी मिळते.

चपराळा वन्यजीव अभयारण्य समृद्ध आणि वैविध्यपूर्ण वनस्पतींसाठी प्रसिद्ध आहे. जी येथील परिसंस्थेचा मुख्य आधार आहे. येथे सागवान, अर्जुन, सालई, महुआ, बेल, धावडा, तेंदू, शिसव आणि सेमल यांसारख्या महत्त्वाच्या वृक्षप्रजाती मोठ्या प्रमाणावर आढळतात. ही झाडे विविध वन्यप्राण्यांसाठी निवास आणि अन्नाचा मुख्य स्त्रोत आहेत.

याशिवाय, जंगलात घनदाट झुडपे आणि गवताळ प्रदेशही मोठ्या प्रमाणावर आढळतात. जे शाकाहारी प्राण्यांसाठी अत्यंत महत्त्वाचे आहेत. हिरवाईने नटलेले हे जंगल आणि विविध प्रकारच्या झाडांचे मिश्रण चपराळाला समृद्ध नैसर्गिक अधिवास बनवते, जिथे असंख्य वन्यजीव प्रजाती निर्भयपणे वाढू आणि फुलू शकतात.

चपराळा अभयारण्यातील ही विपुल वनसंपदा येथील जैवविविधतेचे संरक्षण करण्यास मदत करते आणि संपूर्ण पर्यावरणीय साखळी सुदृढ ठेवते. त्यामुळे, हे अभयारण्य वनस्पती आणि वन्यजीवांसाठी एक महत्त्वाचे नैसर्गिक केंद्र मानले जाते.

चपराळा वन्यजीव अभयारण्य सुमारे १३१ प्रकारच्या वन्यप्राण्यांचे आश्रयस्थान आहे, त्यामुळे हे जैवविविधतेसाठी एक महत्त्वाचे केंद्र मानले जाते. येथे अनेक भक्षक आणि शाकाहारी प्राणी मुक्तपणे संचार करताना पाहायला मिळतात. बंगालचा वाघ, चपळ बिबट्या, दुर्मिळ जंगली मांजर आणि स्लॉथ बेअर (अस्वल) हे येथील प्रमुख सस्तन प्राणी आहेत. याशिवाय, रानकुत्रे आणि कोल्हे हे शिकारी प्राणीही येथे आढळतात. अभयारण्यात सांबर, चितळ, भेकर, नीलगाय आणि रानडुक्कर यांसारखे शाकाहारी प्राणीही मोठ्या प्रमाणावर दिसतात. विशेषतः, उडणारी खार जी आपल्या अद्वितीय उडण्याच्या क्षमतेमुळे पर्यटकांचे विशेष आकर्षण ठरते.



इतक्या विविध प्राण्यांच्या अस्तित्वामुळे चपराळा अभयारण्याचे पर्यावरण संतुलित आणि संपन्न राहते. हे अभयारण्य जैवविविधतेच्या संवर्धनासाठी अत्यंत महत्त्वाचे आहे आणि येथे निसर्गाचा समतोल राखणारी एक स्वतंत्र, स्वयंपूर्ण परिसंस्था अस्तित्वात आहे.

चपराळा वन्यजीव अभयारण्य हे पक्षीप्रेमींसाठी एक खरे स्वर्ग आहे, कारण येथे सुमारे १३१ प्रजातींचे पक्षी आढळतात. निसर्गाच्या कुशीत रमलेल्या या अभयारण्यात रंगीबेरंगी मोर त्यांच्या मोहक पिसा?यांनी जंगलाचे सौंदर्य वाढवतात, तर जंगली कोंबड्यांचे सूर संपूर्ण परिसर अधिक जिवंत करतात.

येथे केवळ स्थानिक पक्ष्यांचेच वास्तव्य नसून, हंगामी स्थलांतरित पक्ष्यांचीही मोठ्या प्रमाणावर वर्दळ असते. त्यामुळे प्रत्येक ऋतूमध्ये हे अभयारण्य वेगवेगळ्या नयनरम्य पक्ष्यांच्या संगमाने नटलेले असते.

या समृद्ध पक्षीवैविध्यामुळे चपराळा हे पक्षीनिरीक्षक आणि वन्यजीव छायाचित्रकारांसाठी एक अत्यंत आकर्षक ठिकाण ठरते.

इतक्या विविध पक्ष्यांच्या उपस्थितीमुळे अभयारण्याचा जैविक समतोल अधिक सुदृढ राहतो आणि संपूर्ण परिसंस्थेला एक अद्वितीय निसर्गसौंदर्य प्राप्त होते. चपराळा अभयारण्यात पक्षी निरीक्षणाचा अनोखा आणि संस्मरणीय अनुभव नक्कीच घेण्यासारखा आहे!

# गडचिरोली : संघर्षातून समृद्धीकडे

(लेखाचा उर्वरीत भाग)

**पर्यटन, कृषी व हरित विकास :** गडचिरोली केवळ उद्योगावरच नव्हे, तर पर्यटनावरही पुढे जाणार आहे. वैनगंगा, इंद्रावती, प्राणहिता अशा नद्या, धबधबे, कोलमार्का अभयारण्य या नैसर्गिक सौंदर्यस्थळांसह ऐतिहासिक आणि वास्तुशिल्पासाठी प्रसिद्ध मार्कंडा मंदिर, वैरागड किल्ला यांसारखी वारसास्थळे जिल्ह्याला पर्यटननगरी बनवतील. पर्यटनातील गुंतवणूक आणि सार्वजनिक वाहतूक सुधारून ही स्थळे अधिक सहज उपलब्ध होतील.

कृषी क्षेत्रात बहुपीक पद्धती, १०० टक्के सेंद्रिय तालुका, तेंदूपत्ता, बांबू व महुआसारख्या वनोपजांवर प्रक्रिया केंद्र व बाजारपेठ निर्माण हाही विकासाचा महत्त्वाचा भाग राहणार आहे. जिल्ह्यातील एक कोटी वृक्ष लागवडीचा उपक्रम भारताचा हरित जिल्हा बनवण्यासाठी एक पाऊल ठरतो.



**नक्षलमुक्त गडचिरोली: आत्मविश्वासाचा नवा अध्याय**

कमी वेळेतही सर्वाधिक मतदानातून संविधानावर विश्वास दर्शविणारा गडचिरोली हा आदिवासी बहुल जिल्हा, निसगार्शी एकरूप होऊन राहणे हीच येथील संस्कृती. मात्र छत्तीसगड व तेलंगणा सिमेवरील जंगल आणि दुर्गम भागात जोरजबरदस्तीने येथील नागरिकांना नक्षलभरतीत ओढून घेण्यात येत होते.

शासनाने जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात रोजगार उपलब्ध करून देण्यावर लक्ष केंद्रित केले. जिल्हा व पोलीस प्रशासनाने दुर्गम व नक्षलग्रस्त भागात शासकीय योजनांचा लाभ पोहचवून नागरिकांचा विश्वास संपादन केला आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि सहपालकमंत्री ॲड. आशिष जयस्वाल यांनी नुकतेच नक्षल्यांच्या बालेकिल्ला असलेल्या भागात छत्तीसगड सीमेवरील कवंडे या गावात नागरिकांशी संवाद साधत शासकीय योजनांचे लाभ वितरित केले. त्यांची उपस्थिती नक्षल विरोधात नागरिकांमध्ये आत्मविश्वास निर्माण करणारी ठरली.

शासनाच्या अथक प्रयत्नांमुळे २०२२ पासून आजपर्यंत १,६५८ माओवादी आत्मसमर्पण करून मुख्य प्रवाहात आले आहेत. प्रशासनाने २०२६ पर्यंत गडचिरोलीला पूर्णतः नक्षलवादमुक्त करण्याचा संकल्प केला आहे. शांतीच्या या वातावरणामुळे भविष्यात उद्योग, शेती, पर्यटन आणि समाजकारण या सर्वच क्षेत्रांत गडचिरोलीची नवी ओळख घडेल.

**समृद्धीकडे वाटचाल :** गडचिरोली जिल्ह्याचा प्रवास हा संघर्षातून उभारी घेणाऱ्या समाजाचा प्रतीक आहे. मागास जिल्हा ही ओळख पुसून ग्रीन स्टील सिटी ही नवी ओळख निर्माण होते आहे. उद्योग, शिक्षण, पर्यावरण आणि पर्यटनाच्या एकत्रित विकासातून गडचिरोली आत्मनिर्भर, आत्मविश्वासू आणि प्रगतिशील जिल्हा बनत आहे, हीच गडचिरोलीची नवी ओळख आहे.

**गजानन जाधव**
**जिल्हा माहिती अधिकारी**
**गडचिरोली.**

# पैसे द्या, पैसे द्या... देवा भाऊ पैसे द्या!

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २६ :

राज्यभरातील सर्वच सरकारी विभागातील कंत्राटदारांचे शासनाकडे दहा महिन्यापूर्वी विविध कामे पूर्ण केल्यावरही देयकापोटी ८९ हजार कोटी रुपये थकले आहे. वारंवार मागणी केल्यावरही पैसे मिळत नसल्याने शेवटी कंत्राटदारांनी नागपुरातील संविधान चौकात एकत्र येत चक्क सामान्य नागरिकांकडे भीक मागितली.

महाराष्ट्रातील सार्वजनिक बांधकाम, ग्रामविकास, जलजीवन मिशन (जलपुरवठा) व इतर विभागांमध्ये कंत्राटदारांकडून कोट्यावधींचे काम करण्यात आली. ही कामे पूर्ण झाल्यावरही शासनाकडून देयके पैसे दिली जात नाही. ही रक्कम एक वर्षांपासून थकलेली असतांना शासनाकडून पैसे मिळत नसल्याने कंत्राटदारांकडून वारंवार संबंधित विभागात चकरा मारल्या जात आहे. परंतु पैसे नसल्याचे सांगत त्यांना परत पाठवले जात आहे.




त्यामुळे कंत्राटदारांची महाराष्ट्र राज्य कंत्राटदार महासंघ, बिल्डर्स असोसिएशन ऑफ इंडिया, नागपूर, कॉन्ट्रॅक्टर्स असोसिएशन, विदर्भ कॉन्ट्रॅक्टर्स असोसिएशन, स्टेट इंजिनिअर्स असोसिएशन, महाराष्ट्र स्टेट जल जीवन वॉटर सप्लाय कॉन्ट्रॅक्टर्स असोसिएशन, स्टेट हॉटमिक्स असोसिएशन, स्टेट लेबर कोऑपरेटिव्ह असोसिएशन, फेडरेशन ऑफ इलेक्ट्रिकल कॉन्ट्रॅक्टर्स असोसिएशन ऑफ महाराष्ट्रसह इतरही संघटना संतापल्या आहे. या संघटनेकडून नागपुरातील संविधान चौकात मंगळवारी देयक मिळण्यासाठी ह्यभीक मांगो ह्य आंदोलन करण्यात आले. आदोलनात कंत्राटदारांनी काळ्या रंगाच्या टी शर्ट घालून नागरिकांना भीक मागितली. त्यानंतर आंदोलकांची परिसरात भाषणे झाली. शासनाने तातडीने देयके अदा न केल्यास तिव्र आंदोलनाचा इशाराही यावेळी दिला गेला.

**शासनाकडून मिळालेले आश्वासन फोल**

कंत्राटदारांनी मागील १२ महिन्यांपासून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि दोन्ही उपमुख्यमंत्री अनुक्रमे एकनाथ शिंदे आणि अजित पवार यांना देयके अदा करण्याबाबत वेळोवेळी निवेदने दिली. सगळ्याच नेत्यांसोबत वेळोवेळी बैठकाही झाल्या. आश्वासनेही दिली गेली. परंतु एकही आश्वासने पूर्ण झाली नसून देयके मिळण्याचे चिन्ह दिसत नाही. त्यामुळे हे आदोलन करावे लागत असल्याचे संघटनेचे म्हणने आहे.

नागपुरात कंत्राटदारांचे भीक मांगो आंदोलन

शासनाकडून देयकाचे पैसे अदा केले गेले नसल्याने सांगलीतील एका कंत्राटदाराने (हर्षल पाटील) काही आठवड्यापूर्वी आत्महत्या केली होती. तर वर्ध्यातील एका कंत्राटदाराने आत्महत्या करण्याचा प्रयत्न केला होता. त्यानंतरही शासनाला कंत्राटदाराचे प्रश्न सोडवण्याबाबत जाग येत नाही.

शेवटी यांसारख्या घटनांसह मोठी रक्कम शासनाकडे थकल्याने आर्थिक कोंडी होऊन कंत्राटदारांच्या मानसिक आरोग्यावर परिणाम झाला आहे. वेळीच देयक न मिळाल्यास कंत्राटदारांच्या आत्महत्या वाढण्याची शक्यताही आंदोलकांनी वर्तवली.

# भंडारा पालकमंत्रीपदी डॉ. पंकज भोयर

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २६ :

सावकारेंची उचलबांगडी



महाराष्ट्राच्या राजकारणात आज मोठी उलथापालथ घडली आहे. भंडारा जिल्ह्याच्या पालकमंत्रीपदी बदल करण्यात आला असून, संजय सावकारे यांची उचलबांगडी करीत त्यांच्या जागी पंकज भोयर यांना भंडाऱ्याची धुरा सोपवण्यात आली आहे.

गेल्या काही दिवसांपासून सावकारेंच्या भंडाऱ्यातील अनुपस्थितीवरून नागरिक नाराज होते. फक्त १५ ऑगस्ट आणि २६ जानेवारीलाच हजेरी, बाकी काळात पालकमंत्री गायब अशी टीका त्यांच्या पाठी लागली होती. स्थानिक समस्या, आढावा बैठकांकडे सावकारेंचे दुर्लक्ष होत असल्याने भंडाऱ्याला खऱ्या अर्थाने पालक हवा, अशी मागणी होत होती.

याच पार्श्वभूमीवर सोमवारी रात्री उपसचिव दिलीप देशपांडे यांनी आदेशपत्र जाहीर करताच राजकीय वर्तुळात खळबळ उडाली. राज्याचे वस्त्र उद्योगमंत्री असलेले संजय सावकारे यांच्याकडून भंडाऱ्याची जबाबदारी काढून घेत, त्यांना केवळ बुलढाणा जिल्ह्याचे सहपालकमंत्री करण्यात आले आहे. उलट पंकज भोयर यांच्यावर गोंदियासह भंडाऱ्याची मोठी जबाबदारी सोपवण्यात आली आहे.

पंकज भोयर हे वर्ध्याचे असल्याने भंडाऱ्याची भौगोलिक व सामाजिक जाण त्यांना आहे. भाजपने स्थानिक पातळीवर पकड मजबूत करण्यासाठी हा डाव खेळल्याची चर्चा आहे.

दरम्यान, पंकज भोयर यांनी आपल्या नियुक्तीनंतर वरिष्ठ नेतृत्वाचे आभार मानले. मागील सहा महिन्यात केलेल्या कामाची दखल घेत नेतृत्वाने माझ्यावर विश्वास दाखवला आहे. भंडाऱ्यात योजनांची रेलचेल करून नागरिकांच्या अपेक्षा पूर्ण करू, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

दुसरीकडे, शिंदेसेनेचे सावकारे यांना हटवून त्यांच्या जागी डॉ. पंकज भोयर यांच्या नियुक्तीवरून शिंदेसेनेच्या लोकप्रतिनिधींनी नाराजी व्यक्त केली आहे. हे आधीच ठरले होते, शिंदेसेनेला कमकुवत करण्याचा हा डाव असल्याचा काहींचा आरोप आहे.


# नागपूर मनपाच्या पदभरतीत ओबीसींना आरक्षणच नाही

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २६ :

नागपूर महापालिकेने पदभरतीमध्ये मोठा गोंधळ केल्याचा आरोप आहे. गट क संवर्गातील विविध १७४ पदांसाठी पुन्हा महाभरती होणार आहे. या भरतीमध्ये इतर मागासवर्गासाठी (ओबीसी) केवळ सहा जागा देण्यात आल्या आहेत. त्यामुळे या पदभरतीवर आक्षेप घेतला जात असून ओबीसींच्या जागा वाढवण्याची मागणी करण्यात आली आहे.

महापालिकेच्या आस्थापनेवर विविध पदांच्या सरळसेवा भरतीसाठी ऑनलाईन अर्ज मागवण्यात येत आहेत. कनिष्ठ लिपिक ६०, विधि सहायक ०६, कर संग्राहक ७४, ग्रंथालय सहायक ८, स्टेनोग्राफर १०, लेखापाल / रोखपाल १०, सिस्टीम ॲनालिस्ट १०, हार्डवेअर इंजिनीअर २, डेटा मॅनेजर १, प्रोग्रामर २ अशा एकूण १७४ पदांसाठी पात्र आणि इच्छुक उमेदवारांनी २६ ऑगस्ट ते ९ सप्टेंबर या कालावधीत ऑनलाईन अर्ज सादर करण्याचे आवाहन महापालिका प्रशासनाने केले आहे. ऑनलाईन अर्ज सादर करण्याचा व परीक्षा शुल्क भरण्याची अंतिम ९ सप्टेंबर आहे.

मात्र, ओबीसी युवा अधिकार मंचाने या भरतीवरच आक्षेप घेतला आहे. ओबीसी युवा अधिकार मंचाच्या वतीने उमेश कोर्राम यांच्या नेतृत्वात महापालिका उपायुक्त विजया वनकर यांना निवेदन देण्यात आले. या निवेदनानुसार, कनिष्ठ लिपिक या पदासाठी ६० जागा निर्धारित आहेत. यामध्ये ओबीसी विद्यार्थ्यांसाठी आरक्षणाप्रमाणे १२ जागा देणे क्रमप्राप्त होते. परंतु, जाहिरातीत ओबीसी प्रवर्गाला एकही जागा देण्यात आली नाही. कर संग्राहक पदासाठीच्या ७४ जागा मध्ये ओबीसीसाठी १४ जागा राखीव असणे आवश्यक असताना एकही जागा देण्यात आली नाही. मनपाच्या जाहिरातीनुसार १० वेगवेगळ्या पदांसाठी १७४ जागांपैकी ३४ जागा ओबीसींसाठी आरक्षित राहणे अपेक्षित होते. परंतु फक्त ६ जागा देण्यात आल्या आहेत. त्यामुळे या जाहिरातीवर आक्षेप घेण्यात आला. निवेदन देतेवेळी उमेश कोर्राम यांच्यासह शुभम तिखट, विनीत गजभिये, दिलीप दुर्गे उपस्थित होते.

ज्येष्ठेभ्यो ज्येष्ठराजाय ज्येष्ठपदप्रदायिने महोदराय पूर्णाय पूर्णानंदाय ते नमः

दैनंदिन कार्यक्रमः
श्रींचे आगमन मिरवणूक -
दि. २७ ऑगस्टः स. ८.३० वा. मंदिरापासून
श्रींचे दैनंदिन अभिषेक/महापूजाः
दि. २८ ऑगस्ट ते ५ सप्टेंबर स. ७ ते सायं. ५
गणेशयाग (उत्सव मंडप):
शुभारंभ - २७ ऑगस्ट - दु. १ वा.
दि. २८ ते ३१ ऑगस्ट स. ८ ते १२, दु.१२.३०ते ४.३०
सहस्त्राभिषेकम्, लक्षार्चना व गणेशयागः दु.१२ ते ४
दि. १ व २ सप्टेंबरः श्रींचे मंदिरात
सामुहिक सूर्य नमस्कारः दि. २९ ऑगस्टः स.६
सामुहिक अग्नीहोत्रः दि. ३० ऑगस्टः स.६
मंत्र जागरः दि. ३ सप्टेंबरः दु. ३ वा.
सत्यविनायक पूजाः दि. ५ सप्टेंबरः दु.४ ते ६
महिला हळदी-कुंकूः दि. ५ सप्टेंबरः सायं.७ ते ८
"श्री गणनायक" रथातून श्रींची भव्य विसर्जन मिरवणूक
दि. ६ सप्टेंबर २०२५ - दु. ४ वाजता

जय गणेश
श्रीमंत दगडूशेठ हलवाई सार्वजनिक गणपती ट्रस्ट, पुणे
सर्व गणेशभक्त बंधू-भगिनींना सस्नेह निमंत्रण - गणेशोत्सव २०२५
वर्ष १३३वे
'श्रीं'ची प्राणप्रतिष्ठापना आज बुधवार दि. २७/०८/२०२५ सकाळी ११.११ वा.
प.पू.आदरणीय श्री घनशामाचार्य महाराज, पीठाधिपती श्री रामानुजाचार्य श्री झालरिया, श्री दास हनुमान देवस्थान, चित्रकुट यांच्या शुभहस्ते
देखाव्याच्या विद्युत रोषणाईचे उद्घाटनः "पद्मनाभस्वामी मंदिर, तिरुवंतपूरम" सायं. ७ वाजता
ना.माधुरीताई मिसाळ, राज्यमंत्री, महाराष्ट्र यांच्या शुभहस्ते
ऋषि पंचमीः दि. २८ ऑगस्ट, पहाटे ६ वाजता महिलांचे अथर्वशीर्ष पठण
प्रमुख पाहुणेः मा.खासदार सौ. सुनेत्राताई पवार, मा.रजनीताई किरण क्षिरसागर, धर्मादाय सहआयुक्त, पुणे
हरी जागरः द्वारा समस्त वारकरी बंधू - दि. २८ ऑगस्ट, रात्री १० ते १२


भारतीयांचे श्रध्दास्थान आणि महाराष्ट्राचे आराध्य दैवत असलेल्या या मंगलमूर्तीचा वैभवशाली उत्सव आज बुधवार दि. २७ ऑगस्ट ते शनिवार दि. ६ सप्टेंबर २०२५ पर्यंत दत्त मंदिर समोरील, बुधवार पेठ येथील पारंपारिक जागेत संपन्न होत आहे. अथर्वशीर्ष आवर्तने, महाभिषेक पूजा, गणेशयाग, हरीजागर, सत्यविनायक असे पवित्र धार्मिक विधी यावेळी संपन्न होणार आहेत. या सोहळ्यात सर्व भाविकांनी सहभागी होऊन हा पवित्र उत्सव आनंदाने पार पाडावयाचा आहे. आपल्या चरणी विनम्र प्रार्थना की आपण 'श्रीं'च्या या पवित्र उत्सव सोहळ्यात सहभागी होवून दर्शन - प्रसादाचा लाभ घ्यावा ही विनंती.


प.पू.श्री घनशामाचार्य महाराज


मा.माधुरीताई मिसाळ मा.सौ.सुनेत्राताई पवार

वेबसाईट क्युआर कोड

दररोज बाप्पांची आरतीः
वेबसाईट
YouTube
facebook
Instagram


पद्मनाभस्वामी मंदिर, तिरुवंतपूरम

श्रीमंत दगडूशेठ हलवाई सार्वजनिक गणपती ट्रस्ट, पुणे ■ सुवर्णयुग तरुण मंडळ, पुणे
गणपती भवन, २५०, बुधवार पेठ, पुणे २, फोनः २४४७९२२२ ■ गणपती सदन, १३२, बुधवार पेठ, शैक्षणिक संकुल, पुणे २, फोनः २४४९२०००
E-mail: contact.dhgt@gmail.com
jayganesh.dhgt@gmail.com
बाप्पांचे ॲप डाऊनलोड कराः २४ तास बाप्पांचे थेट दर्शन



